# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय<br>शुभवर्तमान मानवासाठी कालबाह्य झाले काय?<br>**- अमुल बनसोड** | ३ |
| २) | प्रभू भोजन<br>**- जे.सी.चोट** | ५ |
| ३) | वचनाचा शोध<br>**- जेरी बेट्स** | १० |
| ४) | पहिल्या शतकातील ख्रिस्ती लोक<br>**- कैनथ मैकलेन** | १३ |
| ५) | परमेश्वराची वचने ऐकण्यासंबंधीचा दुष्काळ<br>**- डैनी क्लाइन** | १५ |
| ६) | चवाठ्यावर सिंह आहे<br>**- पी.के. वर्गीस** | १७ |
| ७) | मला ओळखा | २० |
| ८) | पित्याची इच्छा पूर्ण करा<br>**- डॉन एल. नॉरवुड** | २२ |
| ९) | क्षमा आणि राज्य<br>**- गॅरी सी. हॅम्पटन** | २६ |
| १०) | कारभारीपणा<br>**- डब्ल्यू. डग्लस हैरिस** | ३० |
| ११) | प्रार्थनेचे उत्तर<br>**- अमुल बनसोड** | ३३ |
| १२) | पवित्रतेसाठी बोलावणे<br>**- टोनी डब्ल्यू बॉयड** | ३४ |
| १३) | प्रचारकांचे प्रकार | ३६ |
| १४) | शुद्धतेसाठी संघर्ष<br>**- प्रकाश उमके** | ३८ |

१५) मुलाला शिक्षण दे ४१
- **जैक हैरिमन**
१६) तिसऱ्या आणि चौथ्या पिढीपर्यंत ४३
- **डेविड टारबट**
१७) बापांनो, आपल्या मुलांबरोबर वेळ घालवा ४५
- **क्लेरेंस डिलोच जूनि**
१८) देवाची शस्त्रसामग्री ४७
१९) गर्भपात-एक ख्रिस्ती व्यक्तीच्या नजरेत ५०
- **माईकल एल. किंग**
२०) काही न करण्याचे पाप ५२
- **जॉन स्टेसी**
२१) जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी आहे ५५
- **फ्रान्सिस डेव्हिड**
२२) पवित्रशास्त्र टॅटू बनविणे, शरीरावर गोंदवून घेण्याच्याविषयी काय सांगते ? ५८
२३) येशूचा शोध ६०
- **डेविड रोपर**
२४) उपासक ६४
- **सनी डेव्हिड**
२५) पवित्र शास्त्राविषयी थोडक्यात ६८
- **फ्रँकलिन कॅम्प**
२६) पवित्र आत्मा कोण आहे ? ७२
- **जे.सी.चोट**
२७) उद्देशाचे सर्वश्रेष्ठ स्थान ७७
- **डेव्हिड डिफेनबाँग**
२८) बायबल बाप्तिस्मा आणि सुवार्ता तारण ७९
- **पेरी एन. हॉल**
२९) दाखल्याचे सामर्थ्य ८१
- **वेन जॅक्सन**



# संपादकीय
# शुभवर्तमान मानवासाठी कालबाह्य झाले काय?

**- अमुल बनसोड**

**का**ळ बदलतो आजचे नवीन हे उद्याचे 'जुने', सकाळचा नवा शोध हा दुपारी फुटक्या तारवातल्या प्रवाशाप्रमाणे आहे. या वर्षाचा 'प्रसिद्ध' तो पुढील वर्षीच्या 'नव्या' मध्ये हरवून जातो. 'आधुनिक' लवकरच 'जुना पुराना' होतो.

सत्य बदलत नाही. जे आज आहे ते काल होते आणि उद्याही असेल ते ''एकदाचाच पवित्र जनाच्या हवाली केलेला जो विश्वास त्याचे समर्थन करण्यासंबंधीचा बोध तुम्हास लिहून पाठविण्याचे मला अगत्य वाटले'' (यहुदा ३). काहींना वाटते प्राचीन शुभवर्तमान कालबाह्य झाले. ज्या कल्पनेत पातळी, गुणवत्ता, जी संपूर्ण, परिपूर्ण आहे, त्याच्यासाठी ते अप्रचलित, जुने आहे. अध्यात्मिक मृत्यू आणि पापाच्या संकल्पनेची जागा स्वत:च्या अत्यानंद आणि इंद्रिय सुखाने घेतली आहे. स्वत:ला नाकारण्याची कल्पना आता स्वर्ग मिळवणे हे नंतर विचारात घेतली व नंतर पुढे चालली. बायबलची संकल्पना रक्ताचे सामर्थ्य, कुमारीच्या पोटी जन्म, पाप रहीत, त्यागमय, चमत्कारिक तारक उदयास आला पण ही गतकालीन पौराणिक

कथा. नंतर आधुनिकता वाढली. त्यांना आता शुभवर्तमानाची गरज नाही किंवा त्यांना आहे? शुभवर्तमान मानवासाठी कालबाह्य झाले काय?


## जोपर्यंत त्याला आत्म्याच्या अन्नासाठी दुसरा पर्याय सापडत नाही तोपर्यंत

हवा जेव्हा पासून बागेत जेवण बनवत आहे तेव्हापासून भाजी व फळ हे स्वयंपाकगृहात आहे. पण त्याला कोणी जुने, अप्रचलित म्हणत नाही. नोहाने पुरा नंतर कदाचित पहिले मांस जाळावर भाजले असेल. जरी कैक हजारो वर्षे ओसरली तरी मांसाची दुकाने आज चांगल्या रितीचा व्यवसाय करत आहेत. आत्म्यास कोण पोसते ? सुवार्ता त्याची पूर्तता करते. "जे नीतिमत्वाचे भुकेले व तान्हेले ते" (मत्तय ५:६) ख्रिस्ती बालक आधी "निऱ्या दूधाची इच्छा धरते" (१ ले पेत्र २:२) आणि तोपर्यंत विकसित होते जोपर्यंत ते देवाच्या मेजावरील जड अन्न खात नाही (इब्री ५:१२-१४). कुणालाही देवाच्या 'आत्मिक अन्नाचा' पर्याय सापडलेला नाही.

## जोपर्यंत त्याला मानवाच्या गंभीर आजारांवर इतर उपाय सापडत नाही तोपर्यंत

वैद्यकीय उपचार हा मोशेच्या काळापासून चालू आहे (लेविय १२:१-४; अनुवाद २३:१०-१४) पण कोणीही आज दवाखाने, औषधी दुकाने बंद करणार नाही. पापांवर उपचार (क्षमा) ही आजही मानवाची प्राथमिक आध्यमिक गरज आहे (रोम ३:२३; ६:२३) आम्हाला आजही प्राचीन इस्त्रायलचा संसर्ग रोग आहे. "पायाच्या तळव्यापासून मस्तकापर्यंत काहीच धड नाही. जखमा, चेंचरलेले व पुवळलेले घाय आहे; ते कोणी पिळून काढीत नाही, त्यावर कोणी पट्टी बांधीत नाही. कोणी तेलाने नरम करीत नाही (यशया १:६). एकच उपाय आहे ते म्हणजे 'शुभवर्तमान' (रोम १:१६).

• • •



# प्रभू भोजन

- जे.सी.चोट

**या** धड्याच्या आधी आम्ही हे पाहू की, प्रभू भोजन काय आहे? जसे जसे आपण पूढे जाऊ तसतसे पुष्कळशा गोष्टी स्पष्ट होऊन जातील. प्रभूभोजनात आपण भाकर खातो जी आम्हाला येशूच्या शरीराची आठवण करून देते आणि द्राक्षरस आम्हाला येशूच्या रक्ताची आठवण करून देतो. प्रेषित पौलाने म्हटले होते की, "कारण ज मला प्रभूपासून मिळाले तेच मी तुम्हाला सांगितले आहे की, ज्या रात्री प्रभू येशूला धरून देण्यात आले त्या रात्री त्याने भाकर घेतली, आभार मानून ती मोडली आणि म्हटले हे माझे शरीर आहे हे तुमच्यासाठी आहे. माझ्या स्मरणार्थ हे करा. मग भोजन झाल्यावर त्याने प्याला घेऊन तसेच केले आणि म्हटले हा प्याला माझ्या रक्ताने झालेला नवा करार आहे. जितक्यांदा तुम्ही हा पिता तितक्यांदा माझ्या स्मरणार्थ हे करा. कारण जितक्यांदा तुम्ही ही भाकर खाता व हा प्याला पिता तितक्यांदा तुम्ही प्रभूच्या मरणाची तो येईपर्यंत घोषणा करिता." (करिंथकरास पहिले पत्र ११:२३-२६). निसंशय ख्रिस्ती लोकांना भाकर आणि द्राक्षरसामध्ये भाग घेण्यासाठी म्हटले आहे. ज्या की भौतिक वस्तू आहेत, परंतु आमच्यासाठी हे आत्मिक भोजन आहे. हे भोजन शारीरिक भूक आणि तहान मिटविण्यासाठी नाही.

दुसऱ्या ठिकाणी आपण हे पाहणार आहोत की प्रभूभोजनाची स्थापना कोणी केली होती? आम्ही पाहतो की, येशूने स्वत: ह्याची स्थापना केली होती. वल्हांडण सण जो जुन्या करारानुसार वर्षातून एकदा येत होता, येशूने यावेळेस आपल्या शिष्यांना एका ठिकाणी एकत्र केले आणि त्यांच्यासोबत आपल्या मृत्यूच्या पूर्वी या शेवटच्या भोजन खाण्याची इच्छा दर्शविली आणि येथेच त्याने प्रभूभोजनाची स्थापना केली होती आणि प्रभूभोजनाच्याविषयी आपल्या शिष्यांना सांगितले की ज्यांना येशूच्या मागे चालणारे लोक अर्थात ख्रिस्ती लोकांनी त्याच्या मृत्यूला स्मरण करण्यासाठी द्यावे लागणार होते. ह्याच्याद्वारे त्यांनी त्याचे दु:ख, यातना तसेच त्याचे रक्त वाहिल्या जाण्याचे स्मरण करायचे होते. यावर पवित्र शास्त्राच्या नवीन करारामधून पाहू या, ''नंतर बेखमीर भाकरीच्या सणाच्या पहिल्या दिवशी शिष्य येशूकडे येऊन म्हणाले, आपणाकरिता वल्हांडणाच्या भोजनाची तयारी आम्ही कोठे करावी म्हणून आपली इच्छा आहे ? त्याने म्हटले नगरात अमूक एका माणसांकडे जाऊन त्याला सांगा की गुरू म्हणतात, माझी वेळ जवळ आली आहे. मी आपल्या शिष्यासह तुमच्या येथे वल्हांडण सण करतो. मग येशूने सांगितल्याप्रमाणे शिष्यांनी जाऊन वल्हांडणाची तयारी केली. संध्याकाळ झाल्यावर तो बारा शिष्यासह भोजनास बसला; आणि ते भोजन करीत असताना त्याने म्हटले मी तुम्हास खचित सांगतो तुमच्यातला एकजण मला धरून देईल. तेव्हा ते फार खिन्न झाले आणि प्रत्येक जण त्याला विचारू लागला, प्रभूजी मी तर नाही ना? त्याने उत्तर दिले, ज्याने माझ्या बरोबर ताटात हात घातला तोच मला धरून देईल. मनुष्याच्या पुत्राविषयी जसे लिहिले आहे तसा तो जातो खरा; परंतु जो मनुष्याच्या पुत्राला धरून देतो त्या मनुष्याची केवढी दुर्दशा होणार. तो मनुष्य जन्मला नसता तर ते त्याला बरे झाले असते. तेव्हा त्याला धरून देणारा यहुदा ह्याने विचारले, गुरूजी मी तर नाही ना? तो त्याला म्हणाला,

होय तूच. मग ते भोजन करीत असताना येशूने भाकर घेतली व आशीर्वाद देऊन ती मोडली आणि शिष्यास देऊन म्हटले, घ्या, खा हे माझे शरीर आहे आणि त्याने प्याला घेतला व उपकार स्तुती करून तो त्यास दिला व म्हटले, तुम्ही सर्व ह्यातून प्या. हे माझे (नव्या) "कराराचे" रक्त आहे. हे पापांची क्षमा होण्यासाठी पुष्कळांकरिता ओतले जात आहे. मी तुम्हास सांगतो की, मी आपल्या पित्याच्या राज्यात तुम्हाबरोबर नवा द्राक्षरस पीईपर्यंत येथून पुढे द्राक्षाचा हा उपज पिणारच नाही."(मत्तय २६:१७-२९)

हे एक असे भोजन होते ज्यामध्ये जगातून गेल्यावरही भाग घेत राहणे होते. त्याने त्यांना हे अभिवचनही दिले होते जेव्हाही ते एकत्र येतील त्यांच्यामध्ये तो उपस्थित राहील (मत्तय १८:२०). तिसऱ्या ठिकाणी आपण हे पाहू की भाकर कशी तयार होते? पवित्रशास्त्र आम्हाला हे सांगते की ती बेखमीर भाकर असे. ज्यामध्ये काही खमीर न मिळालेले असावे. (निर्गम १२:१७, मत्तय २६:१७). चौथ्या ठिकाणी आम्ही पाहतो की, प्याल्यामध्ये द्राक्षरस असावा. द्राक्ष अनेक जागी आढळतात आणि द्राक्षापासून तयार मनुकेपण प्रत्येक ठिकाणी आढळतात.

पाचवी गोष्ट आम्ही ही पाहतो की ही भाकर काय येशूच्या खरोखरच्या शरीरात परिवर्तीत होऊन जाते ? काही लोक चुकीचे शिक्षण देतात की भाकरीत भाग घेतेवेळी येशूच्या वास्तविक शरीरात परिवर्तीत होऊन जाते. हे सत्य नाही असे कदाचित यासाठी म्हटले जाते की, येशूने म्हटले होते. "आभार मानून ती मोडली, आणि म्हटले हे माझे शरीर आहे, हे तुमच्यासाठी आहे. माझ्या स्मरणार्थ हे करा. (करिंथकरास पहिले पत्र ११:२४). येशू आपल्या शिष्यांना हे सांगण्याचा प्रयत्न करत होता की भाकरीच्याद्वारे ते कोणत्याप्रकारे त्याच्या देहाची आठवण करू शकतात. एक असा देह ज्याला सर्व प्रकारच्या यातनांचा सामना करावा लागला. यासाठी की पापी मनुष्याला तारण मिळू शकेल.

सहावी गोष्ट आम्ही पाहायला इच्छितो द्राक्षरस काय खरोखर रक्त बनते? नाही हे पण एक चुकीचे शिक्षण आहे की द्राक्षरस खरोखर रक्त बनते. "येशूने म्हटले हे माझे (नव्या) 'कराराचे रक्त' आहे. हे पापाची क्षमा होण्यासाठी पुष्कळाकरिता ओतले जात आहे" (मत्तय २६:२८). पवित्र शास्त्र कोणत्याही प्रकारचे रक्त पिण्याची मनाई करते. (प्रेषितांची कृत्ये १५:२९).

सातवी गोष्ट आम्ही ही पाहू इच्छितो प्रभूभोजन कोठे घेतल्या जात होते, आणि आज कोठे घेतल्या जाते? आम्हाला माहीत आहे की हे राज्य अर्थात मंडळीमध्ये घेतल्या जाते. (मत्तय २६:२९)

आठवी गोष्ट आपण पाहू की आठवड्याच्या कोणत्या दिवशी प्रभू भोजन घेण्यात यावे ? प्रेषित २०:७ मध्ये आपण वाचतो की पौल आणि ख्रिस्ती लोक आठवड्याच्या पहिल्या दिवशी अर्थात रविवारी उपासना करण्यासाठी एकत्र येत होते आणि याच दिवशी प्रभूभोजनात भाग घेत होते. आम्ही वाचतो "आठवड्याच्या पहिल्या दिवशी भाकर मोडण्यासाठी एकत्र जमलो तेव्हा पौलाने त्याच्याबरोबर भाषण केले; तो दुसऱ्या दिवशी जाणार होता आणि त्याने आपले भाषण मध्यरात्रीपर्यंत लांबविले." भाकर मोडण्याचा अर्थ प्रभू भोजनाशी आहे.

नववी गोष्ट आपण पाहू की आठवड्याचा कोणता दिवस प्रभू भोजन घेण्यासाठी उचित आहे? कारण प्रभूने आपल्या वचनात आठवड्याच्या पहिल्या दिवसाविषयी म्हटले आहे आणि आम्हाला उपासना याच दिवशी केली पाहिजे.

दहावी गोष्ट आम्ही हे ही पाहू की ख्रिस्ती लोकांनी किती वेळेस प्रभू भोजनात भाग घ्यावा? आम्हाला माहीत आहे की आठवड्याच्या पहिला दिवस प्रत्येक आठवड्यात येतो यासाठी ख्रिस्ती लोकांनी प्रत्येक आठवडयात यामध्ये भाग घेतला पाहिजे. (प्रेषितांची कृत्ये २:४२, करिंथकरास पहिल पत्र १६:२).


अकरावी गोष्ट जी आपण पाहू इच्छितो ती ही आहे की प्रभूभोजनात कोणत्या प्रकारे भाग घ्यावा ? प्रेषित पौलने दाखवले होते की कशाप्रकारे प्रभूने याची स्थापना केली होती आणि नंतर तो म्हणतो, "कारण जितक्यांदा तुम्ही ही भाकर खाता व हा प्याला पिता तितक्यांदा तुम्ही प्रभूच्या मरणाची तो येईपर्यंत घोषणा करिता म्हणून जो कोणी अयोग्य प्रकारे ही भाकर खाईल अथवा प्रभूचा प्याला पिईल तो प्रभूचे शरीर व रक्त ह्यासंबंधाने दोषी ठरेल. म्हणून माणसाने आत्मपरीक्षण करावे आणि मग त्या भाकरीतून खावे व त्या प्याल्यातून प्यावे. कारण त्या शरीराचे मर्म ओळखल्याशिवाय जो खातो व पितो तो खाण्याने व पिण्याने आपणावर दंड ओढवून घेतो" (करिंथकरास पहिले पत्र ११:२६-२९).

बारावी गोष्ट आम्ही ही पाहू इच्छितो की प्रभू भोजन घेण्याचा काय अर्थ आहे? किंवा हे घेण्याचा उद्देश काय आहे? प्रभूभोजन एक आठवण आहे. म्हणजे हे घेण्याचा उद्देश हा आहे की येशूच्या मृत्यूची आठवण करणे यासाठी मनुष्य वधस्तंभावर खिळल्या गेलेले शरीर आणि वधस्तंभावर वाहिलेल्या रक्ताची आठवण करू शकेल.

तेराव्या स्थानी आपण हे पाहतो की, प्रभू भोजनात कोण भाग घेतात. यामध्ये ख्रिस्ती लोक भाग घेतात अर्थातच खरे विश्वासू योग्य ख्रिस्ती.

शेवटची गोष्ट आम्ही ही पाहतो की प्रभू भोजनाद्वारे कोणाला आदर मिळतो. आम्ही पाहतो की, याद्वारे प्रभू येशूला आदर मिळतो. जे ख्रिस्ती यामध्ये भाग घेतात त्यांना ह्याद्वारे शक्ती मिळते. हे आम्हाला आठवण करून देते की, आमच्या तारणासाठी जी किंमत दिली होती तिला न विसरणे. यामध्ये भाग घेतांना आम्ही येशूच्या वधस्तंभाकडे पाहतो, त्याची परत येण्याची वाट पाहतो, तसेच जगाला प्रचार करतो की येशू ख्रिस्त त्यांना तारण देईल, जे त्याची आज्ञा मानून त्याजकडे येतील.

• • •



# वचनाचा शोध

(रोम १३:८-१४)

- जेरी बेट्स

१) कुणाच्या ऋणात राहणे चूक आहे काय? (वचन ८)

२) पौल का म्हणतो की, जर आपण दुसऱ्यावर प्रीती करतो त्याने नियमशास्त्र पाळले आहे. (वचन ८)

३) पौल कोणत्या नियमांबद्दल सांगत आहे. (वचन ९)

४) आपल्या शेजाऱ्यावर प्रीती करणे म्हणजे काय? (वचन ९)

५) नवीन करारात या खेरीज कोणी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती करण्याविषयी सांगितले आहे ? (वचन ९)

६) प्रीती हे नियमशास्त्राचे पूर्णपणे पालन कसे आहे. (वचन १०)

७) योहान ३:१६,१७ मध्ये योहान म्हणतो, आपल्या बंधूवर प्रेम करणे म्हणजे त्याच्यासाठी मरणे किंवा त्याला मदत करणे. तो असे का सूचवतो की, प्रेम म्हणजे कृतीद्वारे एखाद्यास मदत करणे, जेव्हा पौल सुचवितो की, आपल्या बंधूवर प्रेम करणे म्हणजे त्यास इजा, हानी न पोहोचविणे. (वचन १०)

८) एखाद्याने जागृत, विचारी राहणे केव्हा गरजेचे आहे ? (वचन ११)

९) 'अंधारातील कर्मे' कशाशी संबंधीत आहे ? (वचन १२)

१०) प्रकाशाची शस्त्रसामुग्री आपण कशी धारण करू शकतो ? (वचन १२)

११) दिवसा योग्य प्रकारे चालणे म्हणजे काय ? (वचन १३)

१२) चैनबाजी करणे म्हणजे काय? (वचन १३)

१३) ख्रिस्ताला परिधान करणे म्हणजेच प्रकाशाची शस्त्रसामुग्री धारण करणे काय ? (वचन १२,१३)

१४) देहवासना पूर्ण करणे योग्य आहे का? (वचन १४)

एकमेकांवर प्रीती करणे ह्याशिवाय कोणाच्या ऋणात राहू नका. कारण जो दुसऱ्यावर प्रीती करितो त्याने नियमशास्त्र पूर्णपणे पाळले आहे. कारण 'व्यभिचार करू नको, खून करू नको, चोरी करू नको, लोभ' ह्या आज्ञाचा आणि दुसरी कोणतीही आज्ञा असली तरी तिचाही सारांश, 'जशी आपणावर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर' ह्या वचनात आहे. प्रीती शेजाऱ्याचे काही वाईट करीत नाही म्हणून प्रीती हे नियमशास्त्राचे पूर्णपणे पालन होय.

समय ओळखून हे करा. कारण तुम्ही आता झोपेतून उठावे अशी वेळ आली आहे. कारण आपण विश्वास ठेवला तेव्हापेक्षा तारण आता आपल्याजवळ आले आहे. रात्र सरत येऊन दिवस जवळ आला आहे म्हणून आपण अंधकाराची कामे टाकून द्यावी आणि प्रकाशाची शस्त्रसामुग्री धरण करावी. दिवसाढवळ्या साजेल असे आपण शिष्टाचाराने चालावे. चैनबाजीत व मद्यपानात, विषयविलासात व कामासक्तीत, कलहात व मत्सरात नसावे, तर तुम्ही प्रभू येशू ख्रिस्ताला परिधान करा आणि देहवासना तृप्त करण्यासाठी तरतूद करू नका.

टीप : या उताऱ्याचे दोन भाग विभागले आहेत. प्रथम भाग आपणास

आपल्या शेजाऱ्यावर प्रीती करण्यास सांगतो तर दुसरा शुद्धतेबद्दल, पावित्र्याबद्दल सांगतो. पौल गृहीत धरून बोलतो की आपण स्वत:वर प्रीती करतो म्हणून तो म्हणतो जशी स्वत:वर तशी आपण इतरांवर प्रीती केली पाहिजे. आपण म्हणू शकू की आपण खूप प्रीती केली किंवा ती इथपर्यंत आहे जेव्हा आपण इतरांवर प्रीती करतो तेव्हा आपोआप नियमशास्त्राचे पालन करतो. कारण प्रीती शेजाऱ्याचे अहित किंवा हानी करण्यास सांगत नाही. प्रीतीविना आपण वरपांगी नियमांचे पालन करू शकतो पण कुणीही खऱ्या प्रीतीविना नियमांच्या आज्ञेत राहू शकत नाही.

उताऱ्याच्या दुसऱ्या भागात पौल आम्हास जागृत राहण्यास प्रेरित करतो. विश्वासणारे आपण झोपले आहोत हे दाखवितात. या गोष्टीमुळे परिस्थितीच्या तातडीवर भर दिला आहे. अंधारातील कार्ये किंवा पाप नेहमी रात्रीशी निगडीत आहेत. आम्हास अंधारातील कामे सोडून दिवसाढवळ्या साजेल असे वागण्यास उत्तेजित करण्यात आले आहे. आम्ही आमच्या पापाकडे दुर्लक्ष करीत 'कोणीही परिपूर्ण नाही' असे म्हणू नये. जरी हे खरे असले तरी पापासाठी स्पष्टीकरण किंवा सबब नाही.

• • •

पौलाने वचनांचे तीन जोड्या सांगत पापाचे तीन वेगळे गट सांगितले आहेत. ह्यावरून दिसते की ख्रिस्ती हे मोहाला प्रतिकार करीत नाहीत आणि या भागात सांगितलेल्या कार्यात मग्न असतात. तथापि, आपण अशा वर्तणुकीचे स्पष्टीकरण किंवा सबब न देता जसा येशू पवित्रपणे या जगात राहिला तसे वागावे.

# पहिल्या शतकातील ख्रिस्ती लोक

- कैनथ मैकलेन

पहिल्या शतकातील लोक प्रभुच्या मंडळीचे सभासद होते आणि आठवड्याच्या पहिल्या दिवशी (प्रेषितांची कृत्ये २०:७) उपासना करण्यासाठी भाकर मोडण्यासाठी (प्रेषितांची कृत्ये २:४२); (करिंथकरास पहिले पत्र १५:२१-३४). स्तोत्रे गीते गाण्यासाठी (इफिसकरास पत्र ५:१८-२०; कलस्सैकरास पत्र ३:१६,१७). एकत्र सहवासात भाकर मोडण्यास व प्रार्थना करण्यात तत्पर असत. (प्रेषितांची कृत्ये २:४२; थेस्सलनीकाकरास पहिले पत्र ५:१७). मंडळीच्या मदतीसाठी, जे की जगाचे सर्वात माठे कार्य आहे, आपल्याला यश मिळाले असेल त्या मानाने देण्यासाठी (करिंथकरास पहिले पत्र १६:२, करिंथकरास दुसरे पत्र ९:६,७) आणि सर्वात मोठा संदेश जो मनुष्याला मिळू शकतो जे की परमेश्वराचे वचन आहे, ऐकण्यासाठी (प्रेषितांची कृत्ये २:४७, २०:७) एकत्र होत असत.

हे ख्रिस्ती लोक स्थानिक मंडळीमध्ये काम करत आणि एकत्र उपासना करत होते. प्रत्येक स्थानिक मंडळ्यां त्यांच्या वडील लोकांद्वारे चालवल्या जात होत्या. (प्रेषितांची कृत्ये १४:२३), (फिलिप्पैकरास पत्र

१:१, तीताला पत्र १:५). ह्या स्थानिक मंडळ्या एक दुसऱ्यांशी केवळ येशूसोबत आपल्या बंधनानी जोडलेल्या होत्या जो की त्या मंडळीचे मस्तक आहे ज्या मंडळीला त्याने रचलेले आहे.

जर आज आम्ही त्या मंडळीचे सभासद आहोत जिचे सभासद पहिल्या शतकातील ख्रिस्ती लोक होते तर आम्ही त्याच सुवार्तेला म्हणजे येशूचा मृत्यू, त्याचं गाडल्या जाणे, आणि त्याचे पुन्हा जिवंत होण्याला ऐकणे आवश्यक आहे. आम्ही हे शिकवू की लोकांनी पापासाठी पश्चात्ताप करून येशूच्या नावात बाप्तिस्मा घेणे आवश्यक आहे. (गलतीकरास पत्र ३:२६,२७). आम्ही शिकवू की लोकांना पहिल्या शतकातील ख्रिस्ती लोकांसारखे येशूच्या पुढे समर्पण करून त्यांच्यासारखेच ख्रिस्तांच्या मंडळीमध्ये मिळविल्या जाणे आवश्यक आहे. (प्रेषितांची कृत्ये २:४७)

जर आपण खरे ख्रिस्ती आहोत तर आम्ही उद्देश, शिक्षण, संगठण,जीवन आणि आनंदाच्या नवीन कराराच्या नमुन्याचा सांभाळ करायला पाहिजे. ख्रिस्ताच्या मंडळीचा उद्देश आजही तोच आहे जो तेव्हा होता, तो म्हणजे हरविलेल्यांना शोधणे आणि त्याचे तारण करणे (लूक १९:१०).

• • •

> हे ख्रिस्ती लोक स्थानिक मंडळीमध्ये काम करत आणि एकत्र उपासना करत होते. प्रत्येक स्थानिक मंडळ्यां त्यांच्या वडील लोकांद्वारे चालवल्या जात होत्या.

# परमेश्वराची वचने ऐकण्यासंबंधीचा दुष्काळ
## आमोस ८:११

**- डैनी क्लाइन**

दृश्य दुष्काळग्रस्त आफ्रिकेतील आहे. सडपातळ स्त्री आपल्या पाठीवर आपल्या फुगलेल्या लेकराला घेऊन बी गाडण्यासाठी झुकते, नंतर ती गवत वगैरे कापते. दरवर्षी प्रत्येक वर्षी अदृश्य उपजाची देखभाल करत ज्यामध्ये कोणत्याही प्रकारची उपज येण्याची काही आशा नाही.

परंतु जर कोणत्याही प्रकारे या वर्षी पाऊस होईल तो हे सर्वस्वी तुमच्या आमच्याकरिता सांगतो? हो हे तुमच्या आमच्याकरिता लिहिले होते; अशा अर्थाने की, "जो नांगरतो त्याने आशेने नांगरावे आणि जो मळणी करितो त्याने ती उपभोग घेण्याच्या आशेने करावी"(करिंथकरास पहिले पत्र ९:१०). तरी पुष्कळशा हवामानामध्ये आम्ही सर्वशक्तीमान परमेश्वराच्या वचनाचे बी पेरणाऱ्या एखाद्या अंकुरणाची हमी फार कमी प्रमाणात पाहायला मिळते की ते वाढून कापणी करण्यासाठी तयार व्हावे.

अंशत: आपण कापणी करणे सोडून देवू ? बिज्याच्या समयाशिवाय पाऊस पडला तर काय? परंतु जर बीज पेरल्यावर पाऊस पडला तरीही

आपण पाणी देतो... (करिंथकरास पहिले पत्र ३:६)


"वचनाची घोषणा कर, सुवेळी अवेळी तयार राहा, सर्व प्रकारच्या सहनशीलतेने व शिक्षणाने दोष दाखीव, निषेध कर व बोध कर" (तिमथ्याला दुसरे पत्र ४:२).

"प्रभू परमेश्वर म्हणतो, पाहा असे दिवस येत आहे की त्यात मी देशावर दुष्काळ आणीन, तो दुष्काळ पाण्याचा नव्हे, अन्नाचा किंवा पाण्याचा नव्हे तर तो परमेश्वराची वचने ऐकण्यासंबंधीचा होईल" (आमोस ८:११).

वाढण्याच्या दुष्काळासोबत पेरण्याच्या दुष्काळाला मिळविल्या जाऊ शकत नाही. तर आम्ही पेरणी करत राहावे, काय माहीत पाऊस केव्हा येईल.

• • •

> "वचनाची घोषणा कर, सुवेळी अवेळी तयार राहा, सर्व प्रकारच्या सहनशीलतेने व शिक्षणाने दोष दाखीव, निषेध कर व बोध कर" (तिमथ्याला दुसरे पत्र ४:२).



# चवाठ्यावर सिंह आहे

- पी.के. वर्गीस

तुम्ही त्या लोकांचे जे कोणत्याही प्रकारे आपले कर्तव्य पूर्ण करू शकले नाही, अशा लोकांच्या त्याचे बहाण्याविषयी ऐकले असेल कौटुंबिक आणि आध्यात्मिक दोन्ही बाबतीत लोक आपल्या अपयशाला खरे ठरविण्यासाठी नेहमी बहाने बनवतात. जेव्हा आपण विचारतो की त्यांनी सुवार्तेची आज्ञा का मानली नाही किंवा सहभागितेमध्ये का आले नाहीत तर ते त्यांच्या समस्यांना आणि परेशानीला दाखवत असतात. अपयश किंवा आज्ञा न मानण्याला, परमेश्वरासमोर कोणत्याच बहाण्याला खरे ठरविल्या जाऊ शकत नाही. आळशी म्हणतो, रस्त्यावर सिंह आहे, चवाठ्यावर सिंह आहे (नितीसूत्रे २६:१३).

चवाठ्यावर सिंह असणे किती भितीदायक गोष्ट आहे. सिंह जंगलातून निघून वस्ती असलेल्या ठिकाणी आतंक पसरवितो. परंतु लक्ष द्या की आळशाने काय म्हटले होते, तो आत राहणे आणि काही न करण्याच्या बहाण्यासाठी सिंहाला उपयोगात आणत आहे. आम्ही त्याच्या चेतावनीला कसे मानू ?

जर चवाठ्यावर सिंह आहे तर आम्ही काय करावे? लपावे काय? नाही आम्हाला त्याला पकडायला पाहिजे. प्रश्न हा आहे की कसे ?

जर सिंह समाजासाठी धोका आहे तर त्याला पकडणे किंवा मारून टाकणे आवश्यक आहे. त्याला मारावे लागेल. संकटाला पाहून लपून जाण्याचा प्रयत्न करणे किंवा पळून जाणे यात संकटाची समस्यापूर्ती नाही. आम्हाला या संकटाच्या समयामधून उठून जे योग्य आहे ते करायला पाहिजे. आमच्यासमोर हे एक मोठे आव्हान आहे. वचनामध्ये येथे एका कठीण समयाला दाखविले आहे. जर आम्ही डोळे बंद करू तरी आमच्या जीवनाची समस्या सुटू शकणार नाही. यापासून कोणीही वाचू शकत नाही. जेव्हा जीवनाच्या कठीण समस्या आमच्यासमोर येतात तर आम्हाला त्या आळशाप्रमाणे दरवाजा बंद करून बसायला नाही पाहिजे. विजय प्राप्त करायला प्रयत्न करणे आवश्यक आहे. आम्हाला आमचा मेंदू, डोळे चालवायला पाहिजे, चालवावेच लागेल.

दाविदाने गल्याथाची त्याला भिती वाटू दिली नाही. जक्कय म्हणू शकला असता की तो ठेंगणा आहे म्हणून येशूला पाहू शकत नाही. याशिवाय तो आपल्या समस्येला आटोक्यात आणण्यासाठी झाडावर चढला. पौलाने प्रभूच्या सेवेत त्याला हरवण्यासाठी आपल्या शरीराच्या काट्यांना आड येऊ दिले नाही. पेत्र, योहान आणि अन्य शिष्यांना यहुदी पुढाऱ्यांच्या हातून मार खावा लागला. परंतु ते सुवार्ता सांगत राहिले. आरंभातील ख्रिस्ती लोक छळाला घाबरले नाही किंवा त्यांनी विश्वास सोडला नाही. वंधस्तंभावरील मरणाला घाबरून येशू पळाला नाही.

पवित्र शास्त्राच्या इतिहासाच्या लोकांची आणखी खूप प्रेरणादायक घटना आहेत ज्यांनी ''चवाठ्यावर सिंह'' (अडथळे किंवा समस्या) यांना आड येऊ दिले नाही. सर्वशक्तीमान परमेश्वर आमच्याबरोबर आहे म्हणून आम्ही कोणत्याही परिस्थितीचा सामना करू शकतो परंतु आम्हाला त्याच्या सामर्थ्यावर अवलंबून राहायला पाहिजे. ख्रिस्त येशूने जगावर जय मिळविला आहे.

यासाठी ख्रिस्ती रूपात आम्हीही त्याच्या सामर्थ्याबरोबर विजय प्राप्त करू शकतो. येथे दिलेल्या वचनाला पहा जे खरोखर "सिंहाला मारणारी" आहेत, म्हणून आपण या विषयावर काय म्हणू? तर मग या गोष्टीवरून आपण काय समजावे? "देव आपणाला अनुकूल असल्यास आपणाला प्रतिकूल कोण? ज्याने आपल्या स्वत:च्या पुत्रास राखून न ठेवता त्याला आपणा सर्वांकरिता समर्पण केले. तो त्याबरोबर आपल्याला सर्व काही कसे देणार नाही? देवाच्या निवडलेल्या लोकांवर दोषारोप कोण ठेवील? देवच नितीमान ठरविणारा आहे तर दंडाज्ञा करणारा कोण? जो मेला, इतकेच नाही, तर मेलेल्यातून उठला आहे. जो देवाच्या उजवीकडे आहे आणि आपल्यासाठी मध्यस्थीही करीत आहे तो ख्रिस्त येशू आहे. ख्रिस्ताच्या प्रीतिपासून आपल्याला कोण विभक्त करील? क्लेश, आपत्ती, छळणूक, उपासमार, नग्नता, संकट किंवा तरवार ही विभक्त करतील काय? शास्त्रात लिहिल्याप्रमाणे तुझ्यामुळे आमचा वध दिवसभर होत आहे, कापावयाच्या मेंढरासारखे आम्हाला गणिले आहे. उलटपक्षी ज्याने आपणावर प्रीती केली त्याच्या योगे ह्या सर्व गोष्टीत आपण महाविजयी ठरतो. कारण माझी खात्री आहे की, मरण,जीवन,देवदूत,अधिपती, वर्तमानकाळाच्या गोष्टी, भविष्यकाळाच्या गोष्टी, उंची, खोली किंवा दुसरी कोणतीही सृष्ट, ख्रिस्त येशू आपला प्रभू ह्याच्यामध्ये देवाची जी प्रीती आहे तिच्यापासून आपल्याला विभक्त करावयाला समर्थ होणार नाही"(रोमकरांस पत्र ८:१३-३९).

अशी वचने आम्हाला साहस देणारी आहेत. आम्हाला आमची किंवा बहाण्यांना आम्हाला घाबरविण्यास परवानगी घ्यायला नको. निसंशय आळसाला तर काही जागाच नाही. परमेश्वराच्या प्रती आम्हाला सकारात्मक होणे आवश्यक आहे. जर आपण परमेश्वराच्या इच्छेनुसार काम करू तर याचे फार मोठे प्रतिफळ आहे.

• • •

# मला ओळखा

तुम्ही मला ओळखू शकता काय? प्रत्येक इशाऱ्याला वाचा आणि ध्यानपूर्वक विचार करा. जर तुम्ही पहिल्या इशाऱ्यात अंदाज लावाल की मी कोण आहे तर आपणा स्वत:ला १०० गुण द्या. जर तुम्हाला पाचव्या इशाऱ्यानंतर माहीत झाले आहे की मी कोण आहे तर तुमचे गुण ६० आहेत. याचप्रकारे दुसऱ्या इशाऱ्यालाही करा. जेव्हा तुम्हाला भरवसा होईल की तुम्ही मला ओळखले आहे तर परमेश्वराच्या वचनाने त्या तथ्याची पुष्टी करण्यासाठी प्रत्येक इशाऱ्याच्या पुढे दिलेल्या वचनामधून पहा. एका ख्रिस्ती असलेल्या रूपात मी एक चांगला नमुना आहे.

१) १०० माझ्या आजोबांचे नाव होते ओबेद (रूथ ४:१७)
२) ९० एका युवकाच्या रूपात मला एक खतरनाक जबाबदारी दिल्या गेली. (१ शमुवेल १७:३४-३६).
३) ८० मी एक चांगला संगीतकार होतो. (१ ले शमुवेल १६:१२,१८)
४) ७० माझ्या सासऱ्याने मला वारंवार मारून टाकण्याचा प्रयत्न केला तर माझ्या पत्नीने मला खिडकीतून पळून जाण्यास मदत केली. (१ ले शमुवेल १९:१२).
५) ६० सैन्याच्या एका छोट्याशा तुकडीसोबत मी अदुल्लामाच्या गुहेत

लपत राहिलो. (१ ले शमुवेल २२:१).

६) ५० माझा मित्र ज्याच्याशी माझा जीव जडला होता पलिष्ट्यांच्या हातून मारल्या गेला. (१ ले शमुवेल ३१:२)

८) ३० मी व्यभिचार आणि हत्येच्या पापापासून पश्चात्ताप केला. (२ रे शमुवेल ११,१२)

९) २० "मला परमेश्वराच्या मनासारखा पुरुष" म्हटल्या गेले. (१ ले शमुवेल १३:१४).

१०) १० परमेश्वराने मला इस्त्राएलवर वास्तविक "पहिला" राजा नियुक्त केले, ज्याच्या गादीवर येशू बसला होता. (लूक १:३१,३२)

• • •



# पित्याची इच्छा पूर्ण करा

(मत्तय ७:२१, याकोबाचे पत्र २:१०-१२, याकोबाचे पत्र १:१८-२१)

- डॉन एल. नॉरवुड

मत्तय ७:२१ येशूने फारच स्पष्ट केले आहे कोणासाठीही ख्रिस्ती म्हणून पित्याच्या इच्छेला पूर्ण करायला शिकणे गरजेचे आहे. आम्हाला स्मरण ठेवणे आवश्यक आहे की पित्याची इच्छा ते शिक्षण सर्व आहे जे ख्रिस्ताने स्वत: दिले आणि जे प्रेषितांचे शिक्षण आहे की ज्यांना देवाची इच्छा प्रगट करायला आणि लिहायला पवित्र आत्म्याची प्रेरणा दिल्या गेली होती. (इब्रीलोकास पत्र १:१२, योहान १४:२६, योहान १६:१३, पेत्राचे दुसरे पत्र १:२०,२१, पेत्राचे पहिले पत्र १:१०-१२)

नव्या करारात आज मनुष्यजातीसाठी परमेश्वराची संपूर्ण इच्छा प्रगट केलेली आहे. (पेत्राचे दुसरे पत्र १:३-४, तिमथ्याला दुसरे पत्र ३ :१६-१७, रोमकरास पत्र १:१६)

आमच्यासाठी केवळ येशूवर विश्वास ठेवून की तो तारणारा आहे व त्याच्या नावात बाप्तिस्मा घेणेच पूर्ण नाही तर आम्हाला शिकण्याची इच्छा असणे आणि त्या सर्व गोष्टीला मानण्याची इच्छा असणे अत्यंत

आवश्यक आहे. तो आम्हाला पवित्र शास्त्रातून हे करायला सांगतो. (इब्री लोकास पत्र ५:८,९, याकोबाचे पत्र २:१४-२१, लूक १४:३३, मत्तय १०:३४-३९, मार्क १०:२८-३०)

इस्त्राएलचा राजा दाविद असा राजा होता ज्याची इच्छा प्रत्येक गोष्टीत यहोवाच्या इच्छेला पूर्ण करायची होती. (१ ले राजे १४:८, १ ले राजे १५:५) हे खरे आहे की दाविद चालता चालता पडला आणि त्याने भयंकर पाप केले परंतु परमेश्वराने त्याच्या पश्चात्तापामुळे क्षमा केली. कारण दाविदाने सर्वात जास्त परमेश्वराला प्रसन्न करायची इच्छा केली. ख्रिस्ती रूपात तुम्ही आणि मी पाप करून डगमगतो, तेव्हा पुष्कळ काही आम्ही दाविदासारखेच होतो. हे शारीरिक इच्छा आणि पवित्र शास्त्रात दिल्या गेलेल्या पवित्र आत्म्याच्या निर्देशनाच्या संघर्षाचे कारण आहे. (रोमकरास पत्र ७:१४-२५, ८:१,१४, गलतिकरास पत्र ५:१३ चे अध्ययन करा.) दाविदासारखेच आम्हाला देखील प्रत्येक गोष्टीत जास्त परमेश्वराची इच्छा पूर्ण करण्यास आणि जाणून घेण्यास तत्पर राहणे आवश्यक आहे. (कलस्सैकरास ३:१-४).

दाविदाच्या मरणाच्या हजार वर्षानंतर ही पवित्र शास्त्रामध्येम्हटले की, दाविद "परमेश्वराच्या मनासारखा" होता (प्रेषितांची कृत्ये १३:२२). जे काही येथे म्हटले आहे त्याला दैनिक जीवनामध्ये लागू करण्यासाठी व्यवहारिक शब्दामध्ये चालविण्यासाठी या आपण त्या गोष्टीवर विचार करू या की ज्या गोष्टी परमेश्वराने ख्रिस्ती लोकांना करण्यासाठी म्हटले होते. ख्रिस्ताच्या मंडळीच्या सुरूवातीपासून (प्रेषितांची कृत्ये २) ख्रिस्ती लोकांना परमेश्वराची उपासना करण्यासाठी आणि वधस्तंभावर येशूचा मृत्यू आणि दु:खाच्या आठवणीसाठी आठवड्याच्या पहिल्या दिवशी मंडळीच्या रूपात एकत्र होण्यासाठी म्हटल्या गेले होते. (प्रेषितांची कृत्ये २:४२, प्रेषितांची कृत्ये २०:७, मत्तय २६:२६-२९, करिंथकरास पहिले पत्र ११:२३-३०, करिंथकरास

पहिले पत्र १०:१६-१७). ख्रिस्ती लोकांसाठी ह्या घटना इतक्या महत्त्वपूर्ण आहे की जर ते जाणूनबुजून यांना टाळतात तर जाणूनबुजून पाप करून आपल्या प्राणास धोक्यात टाकतात. (इब्री लोकास पत्र १०:२३-३० लक्षपूर्वक वाचा.) लक्ष द्या की, जाणूनबुजून पाप करणे व्यक्तीला येशूच्या रक्तापासून वेगळे करून टाकते की जे त्याला पापापासून शुद्ध ठेवते. (इब्रीलोकास पत्र १०:२६ योहानाचे पहिले पत्र १:५-७).

प्रभूच्या वचनाचे ज्ञानच विश्वास देते. (रोमकरास पत्र १०:१७) आणि विश्वासावाचून त्याला संतोषविणे अशक्य आहे. (इब्रीलोकास पत्र ११:६). याचा अर्थ असा झाला की जर आम्ही वारंवार शिकायला जात नाही तर आपण अध्यात्मिक रीत्या अशक्त होत जाऊ आणि खोट्या शिक्षणाद्वारे भटकून जाण्याच्या धोक्यामध्ये पडू. (योहानाचे पहिले पत्र ४:१६), उपासना, सुवार्तेच्या सभा आणि निरंतर पवित्र शास्त्र अध्ययन टाळणे, आज्ञा मोडण्याचे कारण बनल्या जाते. (इब्रीलोकास पत्र १०:२४, २५, इफिसकरास पत्र ५:१५-१७, पेत्राचे दुसरे पत्र ३:१४-१८). लक्षात ठेवा, जर तुम्ही प्रभूची इच्छा पूर्ण करत नाही तर तुम्ही स्वत:ला फसवित आहात. (याकोबाचे पत्र १:१८-२१, मत्तय ७:२१)

जेव्हा कोणी आठवड्याच्या पहिल्या दिवशी सहभागिता (प्रभूभोजन) घेत नाही तर तो प्रभूच्या वचनाला खाऊ पण शकत नाही. ज्याकडून तो "मनुष्याच्या पुत्राचा देह खाण्यास व त्याच्या रक्तामधून" पिण्यात निष्काम ठरतो (योहान ६:४८-५८).

लक्षात ठेवा की एसावाने एका जेवणासाठी आपले ज्येष्ठपण विकले होते. आम्ही परमेश्वराच्या आज्ञा मोडण्यामुळे आपले ज्येष्ठपण हरवून जातो. (इब्री लोकास पत्र २:१-४, १२:११-१८). हा लेख वाचून यामध्ये लिहिलेल्या वचनाचे अध्ययन करा.

● ● ●

## बालपण आणि तरुणपणाचे दोन उदाहरण

**यहोयाकीम** - "तुझी सुखसोय असता मी तुजबरोबर बोललो, तेव्हा तू म्हणालीस, मी ऐकावयाची नाही. माझे म्हणणे ऐकू नये ही लहानपणापासून तुला खोड आहे." (यिर्मया २२:२१)

**तिमथ्य** - "त्या कोणापासून शिकलास हे आणि बालपणापासूनच तुला पवित्र शास्त्राची माहिती आहे हे तुला ठाऊक आहे; ते ख्रिस्त येशूमधील विश्वासाच्याद्वारे तुला तारणासाठी ज्ञानी करावयाला समर्थ आहे." (तिमथ्याला दुसरे पत्र ३:१५)

# क्षमा आणि राज्य

## मत्तय १८:१५-३५

(आपल्या विरुद्ध दुसऱ्यांच्या पापाच्या प्रति ख्रिस्ती व्यक्तीचे उत्तर)

**- गॅरी सी. हॅम्पटन**

**सा**मान्य मानवी संबंधामध्ये एक भाऊ दुसऱ्या विरुद्ध पाप करेल. येशूने नाराज भावाबद्दल म्हटले की, त्याला आपल्या भावासोबत संबंध स्थापित करण्याच्या प्रयत्नामध्ये आपल्या विरुद्ध पाप करणाऱ्या दोषी भावाजवळ जायला पाहिजे. एडरशेम आम्हाला सांगतो की, ही यहुदी गुरूंच्या शिक्षेच्या अगदी उलट होते. येशूचे म्हणणे होते की पीडित पक्ष साक्षीदाराच्या उपस्थितीमध्ये समस्या दूर करण्याचा प्रयत्न करा. कित्येक वेळा तो याला तीनदा बोलाविणे जाणे आवश्यक दर्शवायचे. याशिवाय तो शांततेची रीत स्वीकारत होता. निसंशय जर चूक करणाऱ्याला आपल्या चुकीची माहिती असती तर चूक दुरूस्त करण्याची जबाबदारी पण त्याचीच असायची. (मत्तय ५:२३, २४).

भावाबरोबर पहिल्या प्रयत्नामध्ये यशस्वी न होण्यामुळे येशूने आपल्या शिष्यांना आणखी दोन अन्य लोकांना सोबत घ्यायला सांगितले. भावाबरोबर सल्ला करण्यास ते त्याची मदत करू शकत होते. समस्येला प्रेमाने मिटवून हरवलेला भाऊ मिळू शकत होते. गोष्ट न मिटल्यामुळे

समस्या मंडळीजवळ घेऊन जाणे होते, की त्या भावाबरोबर या प्रकारे व्यवहार केला जावा ज्याने परमेश्वराच्या ज्ञानाला न मानण्यास नकार दिला.

"माझा भाऊ माझ्याविरुद्ध किती वेळा पाप करेल आणि मी त्याला क्षमा करू?"

प्रभूच्या शिक्षणासाठी पेत्राची प्रतिक्रियाने हे स्पष्ट आहे की, त्याला प्रेमाचा सार समजला नव्हता. एडरशेमच्या अनुसार रब्बीचं शिक्षण होते की "क्षमा तीनपेक्षा जास्त नाही दिल्या जावी." म्हणून पेत्राला वाटले की तो सात वेळा आपल्या भावाला क्षमा करण्याची गोष्ट विचारून उदार बनत आहे. यावरून येशूच्या उत्तरावरून हे माहिती होते की तो आपल्या शिष्यामध्ये असे प्रेमळ मन अपेक्षित होता जे खरोखर क्षमा करू शकेल. मग किती वेळेस क्षमा केली जाईल तेव्हा हा मुद्दाच राहणार नाही.

खरोखरच एक ख्रिस्ती व्यक्तीच्या क्षमेची सीमा परमेश्वराच्या क्षमेसारखीच असायला पाहिजे. शेवटी ज्यांना परमेश्वराची लेकरे बनायचे त्यांना आपल्या पित्यासारखे प्रेम दाखवण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. (मत्तय ५:४३-४८). येशूने जे दृष्टांत सांगितले आहेत त्यामध्ये असेच शिक्षण आहे.

**परमेश्वराची अद्भूत कृपा :**

या दृष्टांतासाठी राजा परमेश्वराला दर्शविल्या गेले आहे. त्याने आपल्या सेवकाला हिशोब ठिक करायला बोलावले. एकाला त्याच्या समोर आणण्यात आले ज्याने त्याचे १०.००० किक्कार देणे होते एक किक्कार जवळवळ १३१ पौंड सोन्याचा किंवा ११७ पौंड चांदीच्या बरोबरीचा होता.

एडरशेमने चांगले म्हटले आहे की, आम्ही आमच्या स्वर्गीय राजाचे देणेदार आहोत. ज्याने आपल्याला ते सर्व सोपविले जे त्याचे आहे आणि आम्ही बेहिशोबी कर्जाला खर्च करत त्याला उजाडले आहे किंवा त्याचा दुरूपयोग केला आहे. त्याने पुढे म्हटले आहे की "परंतु जर नम्रपूर्वक

पश्चात्तापामध्ये आम्ही त्याच्या चरणाजवळ जाऊ तर तो आपल्या अनंत करूणमध्ये न केवळ आम्हाला दंडापासून सोडवायला परंतु सुवार्तेच्या धन्य प्रकाशनाद्वारे आमचे कर्ज माफ करायला तयार आहे.

मनुष्यजातीसाठी परमेश्वराचे अद्भूत प्रेम इतके मोठे कर्ज माफ करण्याच्या इच्छेमध्ये पाहू शकता येते. इस्त्राएलच्या गायकाने घोषणा केली "पश्चिमेपासून पूर्व जितकी दूर आहे तितके त्याने आमचे अपराध आमच्यापासून दूर केले आहेत." त्याने घोषणा केली की "इस्त्राएलांनी यहोवावर आशा ठेवणारे असावे. कारण परमेश्वर दया, कृपा करणारा आणि सुटका देणारा आहे." (स्तोत्रसंहिता १०३:१२). परमेश्वर पापांच्या पक्क्या डागांना घेऊन त्याला पुसण्यासाठी तयार आहे. पश्चात्ताप करून आणि बाप्तिस्मा घेऊन नव्या मनुष्यामध्ये बदलून जाणाऱ्यांना त्याने पापांना पूर्ण रितीने मिटून टाकण्याचे अभिवचन दिले आहे. येशूचा स्विकार करणाऱ्यांना त्याने प्रामाणिकतेने क्षमा करण्याचे अभिवचन दिले आहे. (प्रेषितांची कृत्ये ३:१९, योहानाचे पहिले पत्र १:९)

**निर्दयी सेवक :**

दासाने राजाद्वारा केलेल्या उपकारासाठी त्याला धन्यवाद दिला नाही असे पाहायला मिळते. त्याला फार कमी राशी द्यायची होती आणि त्याने त्याला त्याची मागणी केली. त्याच्या सोबतच्या सेवकाने त्याला तीच विनंती केली जी त्याने राजाला केली होती. तरीही त्याने त्याला पैसे आणण्यासाठी वेळही दिली नाही परंतु त्याला कर्जदारांच्या कैदखान्यात टाकले.

सेवकाच्या ह्या कृतीने राजाच्या या गोष्टीत पाहायला मिळते की इतर सेवकांनी सर्व वार्ता राजाला सांगितली. येथे एक असा व्यक्ती होता त्याला खरोखर हे समजले नाही की राजाच्या कृपेमुळे आपल्या एका डोळ्यातले मुसळ काढल्या गेले होते. आता तो आपल्या सोबतच्या सेवकाच्या डोळ्यातला कुसळ काढायला गेला. (मत्तय ७:१-५). दंड देण्याऐवजी क्षमा

केली पाहिजे. शेवटी ज्यांना परमेश्वराद्वारे क्षमा केली जाते त्यांनीही क्षमा करणारा असणे आवश्यक आहे. (मत्तय ६:१२, १४,१५). पौलाने इफिसकरासच्या भावाना सांगितले "आणि तुम्ही एकमेकांबरोबर उपकारी व कनवाळू व्हा. जशी देवाने ख्रिस्ताच्या ठायी तुम्हाला क्षमा केली आहे तशी तुम्हीही एकमेकांना क्षमा करा (इफिसकरास पत्र ४:३२)"

**क्षमा न करणाऱ्यांसाठी परमेश्वराचे उत्तर :**

जे सर्व झाले होते त्या सर्वांची बातमी राजाला कळाली तेव्हा तो खूप नाराज झाला. त्याला आपल्या सेवकाकडून त्याचप्रकारे क्षमा करण्याची अपेक्षा होती. त्याने क्षमा केली नाही या कारणाने स्वामीने त्याचे कर्ज तसेच ठेवले आणि त्याला तोपर्यंत कैदखान्यात टाकले. जोपर्यंत तो पाई न पाई भरेल. जेलच्या भिंतीमधून इतकी मोठी रक्कम चुकविण्याची कल्पना करा. ही संतापाने भरलेली एक अनंत प्रक्रिया असेल.

येशूने म्हटले याप्रकारे जर तुम्हामधून प्रत्येक जण आपल्या भावाला क्षमा करणार नाही तर माझा पिता जो स्वर्गात आहे तुमच्याशी तसेच करेल. शेवटी आपल्यामधून प्रत्येकाने परमेश्वराच्या दृष्टीत पाप केले आहे. आमचे पाप अनंत मरणाच्या योगे आहेत (रोमकरास पत्र ३:१०,२३, ६:२३). तरीही परमेश्वराने आम्हाला सोडवण्यासाठी क्रुसावर आपल्या पुत्राच्या मरणाचे अवर्णनीय दान दिले आहे(करिंथकरास दुसरे पत्र ९:१५, योहान ३:१६,१७). "आम्ही सर्व मेंढरासारखे बहकून गेलो होतो. आम्ही प्रत्येकाने आपआपला मार्ग धरिला होता अशा आम्हा सर्वांचे पाप परमेश्वराने त्याजवर लादिले (यशया ५३:६). खचितच मोठ्या कर्जापासून मुक्त होण्याकरिता उपकार. कारण आम्हाला त्या लोकांना की ज्यांनी आम्हाविरुद्ध अपराध केला आहे त्यांना क्षमा केली पाहिजे. "आणि तुम्ही एकमेकांबरोबर उपकारी व कनवाळू व्हा; जशी देवाने ख्रिस्ताच्या ठायी तुम्हाला क्षमा केली तशी तुम्हीही एकमेकांना क्षमा करा." (इफिसकरास पत्र ४:३२)

● ● ●

# कारभारीपणा

- डब्ल्यू. डग्लस हैरिस

"कारभारी म्हटला की, तो विश्वासू असला पाहिजे" (करिंथकरास पहिले पत्र ४:२).

व्यवहारिक ख्रिस्ती लोकासहित कमी लोकामध्ये परमेश्वराच्या प्रती आपल्या जबाबदारीच्या कारभारीपणाची अवधारणा मिळते. परंतु पवित्र शास्त्रात या रूपकाचा उपयोग पुष्कळ वेळेस झाला आहे. या वचनावर शिक्षणावर ध्यान देऊन आम्ही चांगले करू.

कारभारी तो असतो जो कोण्या दुसऱ्यासाठी आर्थिक किंवा संपत्तीच्या माध्यमात व्यवस्थापकाच्या रूपात काम करतो. चांगला कारभारी विश्वसनीय सेवक असतो. ज्याला त्याचा स्वामी, मालक आपल्या व्यवसायाला वाढविण्यासाठी जबाबदारी देतो. परमेश्वराबरोबर आमचा हाच संबंध आहे. म्हणजे आम्हाला जे काही सोपविले आहे त्या सर्वांचा हिशोब द्यावा लागेल.

जेथे कारभारीपण असते तेथे स्वामित्व पण असते. जे काही आमच्याजवळ आहे आणि जे आपण आहोत ते परमेश्वराच्या कारभारीरूपातच आहोत. सृष्टीच्याद्वारा आम्ही परमेश्वराची संपत्ती आहोत (उत्पत्ती १:२६). मुक्तीच्या अधिकाराद्वारे आम्ही येशूमध्ये आहोत. (योहान

३:१६, इफिसकरास पत्र १:७). करिंथ येथील ख्रिस्ती लोकांसाठी पौलाने सांगितले होते "तमचे शरीर तुम्हामध्ये वसणारा जो पवित्र आत्मा देवापासून तुम्हाला मिळाला आहे त्याचे मंदिर आहे हे तुम्हास ठाऊक नाही काय? आणि तुम्ही स्वत:चे मालक नाही. कारण तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहा. म्हणून तुम्ही आपल्या शरीराने देवाचे गौरव करा" (करिंथकरास पहिले पत्र ६:१९,२०). अगदी सत्य आहे की, आमचे काहीच नाही(स्तोत्रसंहिता २४:१). सर्व समय योग्यता आणि संसाधन आम्हाला प्रभूद्वारा त्याच्या सेवेसाठी लावायला दिल्या गेले आहे. वेळ॰ही प्रभूपासून आहे आणि वेळ, समय, किती लवकर लवकर निघून जातो. (याकोबाचे पत्र ४:१३,१४, इयोब १:२१). प्रयेक योग्यता प्रभूकडूनच मिळते. (अनुवाद ८:१८, मत्तय २४:१४,१५, याकोबाचे पत्र १:१७). सर्व संसाधन आपल्याला वरूनच मिळतात. (तिमथ्याला पहिले पत्र ६:७) धनवान मुर्खाने म्हटले, "माझे धान्य व साठा माझा द्रव्यसंचय." जेव्हा की परमेश्वराने म्हटले, "मग कोणाचे होईल?" (लूक १२:१६-२०) थॉमस हॉरनने याला याप्रकारे म्हटले, "आमचे लेकरे, संबंध, मित्र, सन्मान, घर, जमीन, पैसा, आरोग्य आणि येथपर्यंत कृपाही प्रभूपासून आहे."

कारभारीपणात या गोष्टी मिळतात.

१) विश्वासू असला पाहिजे. (करिंथकरास पहिले पत्र ४:२)

२) आज्ञापालन करणारा असावा. (अनुवाद १०:१२,१३, ११:२६-२८, मत्तय ७:२१-२३)

३) कुटुंब, मित्र आणि सरकारच्या प्रति आपले दायित्वाच्यापेक्षा परमेश्वराच्या दायित्वाला प्राथमिकता देणारा असावा. (मत्तय १०:३७-३९, लुक ५:१०,११, प्रेषितांची कृत्ये ५:२९)

आम्ही तुला तुझेच सोपवतो,

ते दोन जे काही आहे
जे काही आमच्याजवळ आहे ते
तुझेच तर आहे
हे प्रभू, भरोसा, तुझ्याकडूनच मिळाला आहे
याप्रकारे आम्ही खऱ्या कारभाऱ्याप्रमाणे तुझे
बक्षीस प्राप्त करू
आणि जसा तू आम्हाला आशीर्वाद देतो आनंदाने
आमच्या पहिल्या फळाला तुला देऊ.

• • •

जेथे कारभारीपण असते तेथे स्वामित्व पण असते. जे काही आमच्याजवळ आहे आणि जे आपण आहोत ते परमेश्वराच्या कारभारीरूपातच आहोत. सृष्टीच्याद्वारा आम्ही परमेश्वराची संपत्ती आहोत (उत्पत्ती १:२६).

# प्रार्थनेचे उत्तर

- अमुल बनसोड

एका विश्वासूने नदीमध्ये गळ टाकत प्रार्थना केली की, "हे प्रभू, लवकरात लवकर एक मासा लागू दे तर मी घरी लवकर जाईन."

त्याने गळ टाकताच एक मासा लागला आणि त्याने ती काढली. त्याला वाटले की प्रार्थनेचे उत्तर फार लवकर मिळते. आणखी एक मागतो.

त्याने पुन्हा प्रार्थना केली, "प्रभू बस एक आणखी लागू दे तर मी चालल्या जाईन." आणि गळ टाकला आणि या वेळेस पुन्हा गळ टाकताच पुन्हा एक मासा लागला आणि त्या तो पण मासा काढून घेतला.

त्याने विचार केला की प्रभू तर प्रार्थना ऐकत आहे लगेचच आणखीन एक मागतो. त्याने गळ टाकल्यावर पुन्हा तीच प्रार्थना केली.

या वेळेस तो गळ ओढत होता तर त्याला वाटले की मोठा मासा गळाला लागला आहे. जवळ आल्यावर त्याने पाहिले की पाण्यामधला एक साप त्याच्या गळाला लागला आहे. त्याने पुन्हा प्रार्थना केली की, "प्रभू आणखी नको. दोनच पुऱ्या आहेत."



# पवित्रतेसाठी बोलावणे

**- टोनी डब्ल्यू बॉयड**

ख्रिस्ती जीवन पुष्कळशा लोकांसाठी भरपूर काही आहे. खऱ्या सुवार्तेचा एक गुण सर्वांपेक्षा वेगळा असतो. हा गुण पवित्रता आहे. पवित्रता आमच्या जीवनाचा स्वाभाविक भाग नाही. आम्हाला आमच्या आईवडिलांकडून वारसाने मिळत नाही आणि नाही आम्हाला त्या लोकांच्या आसपास राहून ज्यांना आपण पवित्र मानून त्यांचा आदर करतो

पवित्र जीवनाचा आरंभ आज्ञाधारक बालक बनल्याने होतो. "तुम्ही आज्ञांकित मुले व्हा आणि अज्ञानावस्थेतील आपल्या पूर्वीच्या वासनानुसार वागूवर्तू नका"(पेत्राचे पहिले पत्र १:१४). एखाद्या व्यक्ती आपल्या जीवनाच्या संसारिक इच्छेच्या अज्ञानतेवर पवित्र बनत नाही. परंतु जसे की पौलाने सांगितले, "देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही

समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या. (रोमकरास पत्र १२:२)

परमेश्वराच्या लेकरांच्या रूपात आम्हाला पवित्र जीवन जगायला बोलावल्या गेले आहे. "तर तुम्हास पाचरण करणारा जसा पवित्र आहे तसे तुम्हीही सर्व प्रकारच्या आचरणात पवित्र व्हा; कारण असा शास्त्रलेख आहे की तुम्ही पवित्र असा, कारण मी पवित्र आहे" (पेत्राचे पहिले पत्र १:१५,१६). खरी पवित्रता परमेश्वराबरोबर खरे संबंध असल्यानेच मिळते. जितके आम्ही त्याच्याजवळ असू तितकेच आम्ही आमच्या जीवनाला पवित्र बनवू शकतो.

ही पवित्रता त्या ज्ञानाने आणि सामर्थ्याने आणि प्रेरणा देते की, आम्हाला येशूच्या बहुमोल अविनाशी रक्ताद्वारे विकत घेतल्या गेले आहे, जे की आमच्या पापासाठी मृत्यूची परमेश्वराची अट आहे. (रोमकरास पत्र ६:२३, पेत्राचे पहिले पत्र १:१८,१९, योहानाचे पहिले पत्र २:१,२). आमचे जीवन केवळ थोड्या वेळपर्यंत आहे. "तर ही सर्व अशी लयास जाणारी आहेत म्हणून पवित्र वर्तणुकीत व सुभक्तीत राहून देवाचा दिवस येण्याची वाट पाहत व तो दिवस लवकर यावा म्हणून खटपट करीत तुम्ही कशाप्रकारचे लोक असावे बरे?" (पेत्राचे दुसरे पत्र ३:११).

थोडक्यात आम्ही पाहतो की, ख्रिस्ती व्यक्तीचे जीवन जगापेक्षा वेगळे आहे. परमेश्वराने आम्हाला जगामधून एका अशा जीवनामध्ये बोलावले आहे जे आमच्यासाठी स्वर्गात त्याच्याबरोबर राहण्यासाठी योग्य आहे. या आपण परमेश्वराच्या पवित्र लोकांच्या रूपात जीवन घालवू यासाठी की आम्ही अनंत काळापर्यंत त्याच्याबरोबर राहू शकू.

• • •



# प्रचारकांचे प्रकार

**मूर्ख प्रचारक :**

"भ्रष्टाचार करावा, परमेश्वराविरुद्ध पाखंड सांगावे, भूकेला जीव भूकेला ठेवावा, तान्हलेल्यास पिण्यास काही मिळू देऊ नये म्हणून मुर्ख मूर्खतेचे भाषण करितो, त्याचे मन अधर्म करिते" (यशया ३२:६).

**प्रसिद्धी प्रचारक :**

"माणसांना खुश करणाऱ्या लोकांसारखे तोंड देखल्या चाकरीने नव्हे तर देवाची इच्छा मनापासून पूर्ण करणाऱ्या ख्रिस्ताच्या दासासारखे ते करीत जा" (इफिसकरास पत्र ६:६).

**राजकारणी प्रचारक :**

"कारण माझ्या बंधूनो, तुमच्यामध्ये कलह आहेत असे मला ख्लोवेच्या माणसाकडून कळले आहे. माझे म्हणणे असे आहे की, तुमच्यापैकी प्रत्येक जण मी पौलाचा, मी अपुल्लोसाचा, मी केफाचा आणि मी ख्रिस्ताचा आहे असे म्हणतो. ख्रिस्ताचे असे विभाग झाले आहेत काय? पौलाला तुम्हासाठी वधस्तंभावर खिळले होते काय? पौलाच्या नावात तुमचा बाप्तिस्मा

झाला होता काय"? (करिंथकरास पहिले पत्र १:११-१३).

**फक्त बाप्तिस्मा पसंत प्रचारक :**

"कारण ख्रिस्ताने मला बाप्तिस्मा करावयास नव्हे तर सुवार्ता सांगावयास पाठविले. पण ख्रिस्ताचा वधस्तंभ व्यर्थ होऊ नये म्हणून ती वाक्चातुर्याने सांगण्यास पाठविले नाही". (करिंथकरास पहिले पत्र १:१७)

**वक्तृत्वपटू प्रचारक :**

"बंधूजनहो, मी तर तुमच्याकडे आलो तो वक्तृत्वाच्या अथवा ज्ञानाच्या श्रेष्ठतेने देवाचे रहस्य तुम्हास सांगत आलो असे नाही. तुमचा विश्वास मनुष्याच्या बुद्धिमत्तेवर उभारलेला नसावा तर देवाच्या सामर्थ्यावर उभारलेला दिसावा म्हणून माझे भाषण व माझी घोषणा ज्ञानयुक्त अशा मन वळविणाऱ्या शब्दांची नव्हती तर आत्मा व सामर्थ्य ह्यांची निदर्शक होती". (करिंथकरास पहिले पत्र २:१,४).

**परंतु आम्ही कोण आहोत ?**

"ते आम्ही मानवी ज्ञानाने शिकविलेल्या शब्दांनी नव्हे तर आत्म्याने शिकविलेल्या शब्दांनी, आध्यात्मिक गोष्टीबरोबर आध्यात्मिक गोष्टीची संगती लावून सांगतो" (करिंथकरास पहिले पत्र २:१३).

"पुष्कळ लोक देवाच्या वचनाची भेसळ करून ते बिघडवून टाकतात. आम्ही त्यांच्यासारखे नाही तर जसे सात्विकपणाने व देवाच्याद्वारे बोलावे तसे आम्ही देवासमक्ष ख्रिस्ताच्या ठायी बोलणारे आहो" (करिंथकरास दुसरे पत्र २:१७).

"त्यानेच आम्हाला नव्या कराराचे सेवक होण्यासाठी समर्थ केले, तो करार लेखी नव्हे तर आध्यात्मिक आहे, कारण लेख जिवे मारतो, परंतु आत्मा जिवंत करितो" (करिंथकरास दुसरे पत्र ३:६).

● ● ●

# शुद्धतेसाठी संघर्ष

- प्रकाश उमके

रँडम हाऊस कॉलेज डिक्शनरीमध्ये इंग्रजी भाषेचा शब्द Sterling चा अर्थ "शुद्धता" दिल्या गेला आहे. आम्ही आपल्या घरात, आपल्या कुटुंबात आणि जगण्याच्या आपल्या रितीमध्ये या अगदी शुद्धतेला प्राप्त करण्याची मनिषा ठेवतो. यासाठी न कोणत्या ना कोणत्या प्रकारे आम्हाला प्रेमाचे गुण असलेल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूंना सोबत ठेवणे आवश्यक आहे.

कोणी एक मनुष्य मरण पावला, प्रेतक्रियेच्या वेळेस प्रचारक त्याची स्तुती करते समयी एका लहानशा पुलपीटजवळ त्याचा लहान मुलगा पुष्कळ लहान मुलांजवळ बसलेली होती. प्रचारक तिच्या पतीचे गुणगान करत असता तिने ऐकले. तिने तिच्या लहान मुलाच्या कानात म्हटले, की "जाऊन पहा की प्रेतक्रियेच्या पेटीमध्ये तुझा बापच आहे का कोणी दुसरा आहे?"

अगदी शुद्ध प्रेमाला प्राप्त करण्याच्या सहाय्तेसाठी आम्हाला ते रहस्य कोठे मिळू शकते? आम्ही वर्तमानपत्र किंवा दूरदर्शनच्या आयोजकावर आम्हाला सहाय्य करण्यासाठी अवलंबून राहू शकत नाही. लग्नाच्या वेळेस

परामर्श देणारे सल्ला देतात परंतु त्याच्याकडून आम्हाला विरोधाभासी विचारच ऐकायला मिळतात. जीवनाच्या खोल रहस्याच्या शोधामध्ये आम्ही त्याच पुस्तकाजवळ जातो ज्यांना आपली आई सांगत असायची.

पवित्र शास्त्रात उत्पत्तीच्या दुसऱ्या अध्यामध्ये आम्ही वाचतो की विवाहसंस्था निर्माण करणारा परमेश्वरच आहे. "मग परमेश्वर देव बोलला, मनुष्य एकटा असावा हे बरे नाही; तर त्याच्यासाठी मी अनुरूप सहाय्यक करीन" (उत्पत्ती २:१८). नंतर नव्या करारात परूश्यानी सुटपत्राच्या विषयावर येशूला पारखले. मत्तय १९:३-९ मध्ये पुन्हा पहा वचनामध्ये येशू म्हणतो, "ह्याकरिता पुरुष आईबापास सोडून आपल्या बायकोशी जडून राहील आणि ती दोघे एकदेह होतील? ह्यामुळे ती पुढे दोन नव्हतं तर एकदेह अशी आहेत म्हणून देवाने जे जोडले आहे ते माणसांनी तोडू नये."

हे या गोष्टीला स्पष्ट करते की विवाह एक ईश्वरीय संस्था आहे. परमेश्वराने विवाहाला रचले आहे. हा जीवनभराचा अनुबंध आहे. ही पुरुष आणि स्त्रीसाठी परमेश्वराची सुंदर योजना आहे.

पुष्कळदा पती-पत्नीमधून कोणी एक आपल्या सहकाऱ्याच्या प्रती प्रामाणिक न होता त्याला धोका देतो. मत्तय १९ व्या अध्यायातील ९ वे वचन वाचा की जेथे येशू ही गंभीर ताडना देत आहे. "मी तुम्हास सांगतो की, जो कोणी आपल्या बायकोला जारकर्माच्या कारणाशिवाय टाकून दुसरी करितो तो व्यभिचार करितो (आणि जो कोणी अशा टाकलेल्या स्त्रिबरोबर लग्न करितो तोही व्यभिचार करितो)."

करिंथकरास पहिले पत्र ६:९,१० मध्ये पौल पापांची एक लांब यादी बनवितो. ज्यामध्ये आम्हाला व्यभिचार हा शब्दही पाहायला मिळतो. तो म्हणतो की असे जीवन जगणारे "परमेश्वराच्या राज्याचे वारस होणार नाहीत."

आपल्या पवित्र शास्त्रामध्ये इफिसकरास पत्राच्या पुस्तकामध्ये अध्याय ५ वा उघडल्यावर आम्ही लग्नाच्या या कार्यामध्ये व्यवहारिक मार्गदर्शनाचा शोध करतो. येथे आम्हाला हे निर्देश मिळतात.

१) "पती पत्नीचे मस्तक आहे." (वचन २३)

२) "हे स्त्रियांनो आपापल्या पतीच्या अधीन असा."

३) "पत्नीने ह्या गोष्टीकडे लक्ष द्यावे पत्नीने आपल्या पतीची भीड राखावी."

४) "पतींनो, जशी ख्रिस्ताने मंडळीवर प्रीती केली तशी तुम्हीही आपआपल्या पत्नीवर प्रीती करा, ख्रिस्ताने मंडळीवर प्रीती केली आणि स्वत:स तिच्यासाठी समर्पण केले."

५) "ज्याप्रमाणे पतींनी आपआपली पत्नी आपलेच शरीर आहे असे समजून तिच्यावर प्रीती करावी. जो आपल्या पत्नीवर प्रीती करितो तो स्वत:वरच प्रीति करितो.

जर पती पत्नीवर तशीच प्रीती करतो जशी परमेश्वराने आज्ञा दिली आहे तर ती सहज आपणा स्वत:ला त्याच्या अधीन करू शकते आणि ते आनंदाने राहतील. त्याच्या प्रेमातून तो गुण निघेल, ज्याची आम्हाला आवड आहे. त्यांना शुद्ध विवाह मिळेल.

"एका गोष्टीचे नेहमी स्मरण ठेवा की घरातील समस्येला सोडविण्यासाठी सल्ला घेणे, घराचा नाश करण्यासाठी सूटपत्राच्या न्यायालयात जाण्यापेक्षा कितीतर चांगले आहे. घर तुटल्यावर प्रत्येक काही पीडित होते, परंतु लेकरे सर्वात अधिक पीडित होतात."

• • •



# मुलाला शिक्षण दे

- जैक हैरिमन

**बु**ध्दीमान शलमोनाने म्हटले आहे, "मुलाच्या स्थितीस अनुरूप असे शिक्षण त्याला दे, म्हणजे वृद्धपणीही तो त्यापासून परावृत्त होणार नाही" (नीतिसूत्रे २२:६). बालकाला ज्या मार्गात त्याला चालायला पाहिजे त्यामध्ये प्रशिक्षित करण्याचा अर्थ आहे की योग्य मार्गाबरोबरच चुकीचा मार्गही आहे हे शिकविणे गरजेचे आहे. ह्याचा अर्थ हा पण आहे की जर बालकाला योग्य, खऱ्या मार्गावर चालायचे आहे तर त्याच्यासाठी त्या मार्गावर चालण्यासाठी शिकणे आवश्यक आहे. शलमोनाने म्हटले होते "बालकाच्या हृदयात मुर्खता जखडलेली असते. शासनवेत्र त्याच्यापासून तिला घालवून देते" (नीतिसूत्रे २२:५). आणि "छडी व वाग्दंड ज्ञान देतात, पण मोकळे सोडलेले पोर आपल्या आईला खाली पाहावयास लावते" (नीतिसूत्रे २९:१५).

जर आम्ही आपल्या लेकरांना त्या मार्गाचे शिक्षण देऊ इच्छितो

ज्यामध्ये त्यांना चालावयाचे आहे तर आम्हाला स्वत:लाही त्या मार्गाची माहिती होणे आवश्यक आहे. येशूने म्हटले होते, "आंधळा आंधळ्याला नेऊ लागला तर दोघेही खाचेत पडतील." (मत्तय १५:१४). स्पष्टपणे जर आम्हाला खऱ्या मार्गाची माहिती नाही आम्ही आमच्या लेकरांना योग्य मार्गावर चालण्याचे शिक्षण देऊ शकणार नाही.

जर आपण आपल्या लेकरांना त्या मार्गाचे शिक्षण देऊ इच्छितो ज्या मार्गात त्यांना चालायचे आहे तर आम्हाला स्वत:ला त्या मार्गावर चालायची आवश्यकता आहे. जर आम्ही त्यांना हा विश्वास देतो की, जीवनामध्ये धन आणि सुख सर्वात महत्त्वपूर्ण आहे, तर तो मानतील. जर आम्ही त्यांना विश्वास देतो की भौतिक वस्तू आध्यात्मिक वस्तूपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण आहे तर ते मानतील. आमचे मूल्य ही त्यांचे मूल्य बनतात.

जर आमच्या लेकरांना त्या मार्गावर चालू देऊ, ज्या मार्गावर त्यांना चालायचे आहे त्या मार्गावर चालायला शिकणे आवश्यक आहे. त्यांच्या प्रशिक्षकासाठी खरोखर व निरंतर शिक्षण आवश्यक आहे. आम्हाला आमच्या लेकरांच्या मनात ते सर्व टाकावे लागेल जे परमेश्वर आणि मनुष्य दोघांच्या नजरेत बरोबर आहे योग्य आहे. यासाठी की ज्ञानाच्या कमीपणामुळे ते नाश पावणार नाहीत. (होशेय ४:६). शिकण्यासाठी अभ्यास आणि मग फक्त अभ्यासच आवश्यक आहे. त्यांना फक्त शिकविणेच आवश्यक नाही परंतु ह्याला व्यवहारामध्ये आणणेही आवश्यक आहे. आईवडिलांनी जोपर्यंत त्यांची लेकरे त्यांच्या अधीन आहेत तोपर्यंत त्यांनी त्यांना शिकवत राहावे.

तुम्हाला मार्गाची माहिती आहे काय? तुम्ही त्या मार्गावर चालत आहात काय? तुम्ही तुमच्या लेकरांना त्या मार्गाचे शिक्षण देत आहात काय?

● ● ●

# तिसऱ्या आणि चौथ्या पिढीपर्यंत


- डेविड टारबट

**मी** निर्गम २०:५ च्या गोष्टीने चकीत होतो की, "त्यांच्या पाया पडू नको किंवा त्यांची सेवा करू नको. कारण मी तुझा देव परमेश्वर ईर्ष्यावान देव आहे जे माझा द्वेष करितात त्यांच्या मुलांना तिसऱ्या-चौथ्या पिढीपर्यंत वडिलांच्या अन्ययाबद्दल शासन करितो, "हे तथ्य अर्थपूर्ण आहे. याचे काहीतरी महत्त्व असेल की परमेश्वर आपल्या रागाला पाचव्या, सहाव्या किंवा दहाव्या पिढीपर्यंत घेऊन जाण्याशिवाय "तिसऱ्या, चौथ्या पिढीपर्यंत सीमित करतो. मी विचार केला की या गोष्टीत महत्त्व आहे की तिसरी किंवा चौथी पिढी एक दुसऱ्यांना प्रभावित करून जीवन व्यतित करतात. बापाचा पापपूर्ण व्यवहार त्याच्या समकालीन सर्व पिढीमध्ये आढळल्या जातो. लेकरे आपल्या आईबापाला पाहतात, नातू, नातीन, आपले आजी, आजोबा, पणतू, परपणतू, आपले पणजोबा, पणजीला, आपल्या आदर्शाच्या रूपात पाहतात. प्रत्येक पिढी आपल्यापासून मागच्या पिढीच्या वाईट व्यवहाराला अनुसरतात. याप्रकारे तिसरी आणि चौथ्या पिढीवर आपला क्रोध आणण्यासाठी परमेश्वर न्यायी आहे. कारण या सर्व पिढ्या एकाच पापामध्ये लागलेल्या कारणामुळे एक दुसऱ्याचे अनुसरण करतात.

जर लेकरे, नातू, पणतू आणि परपणतूवर पापपूर्ण व्यवहाराचा इतका पक्का आणि जबरदस्त प्रभाव आहे तर धार्मिक व्यवहाराचासुद्धा प्रभाव होऊ शकतो. आईवडिलांसाठी हा विचार करणे की त्यांचा आत्मिक प्रभाव केवळ आपल्या लेकरावर राहतो, जोपर्यंत ते त्यांच्या अधीन असतात. खरे तर हे आहे की, आई बापाचा प्रभाव आपल्या लेकरांच्या जीवनात, ते व्यर्थ का असेना कधीच संपणार नाही. तुम्ही विचार करणे बंद केले आहे काय की आजी,आजोबाचा आपल्या नाती,नातवांवर महत्त्वपूर्ण प्रभाव राहतो.

या कारणाने आम्हामधून प्रत्येकांना प्रभूचे आणि त्यांच्या मंडळीचे विश्वासू बनून राहणे आवश्यक आहे. जो नमुना आम्ही ठरवितो. त्यावरून हे सिद्ध होईल की आमचे लेकरे आणि लेकरांची लेकरे देवाच्या राज्यात आहेत. अन्य शब्दांमध्ये आईबापाचे काम कधी संपत नाही. ते आपल्या लेकरांच्या घरातून जाण्याच्या खूप वेळेनंतरही आपला चांगला किंवा वाईट प्रभाव सोडत असतात. यासाठी शेवटपर्यंत प्रामाणिक असा. कारण जे सर्व तुम्ही तुमच्या प्रामाणिकपणाने देता त्याला तुम्ही जाण्यानंतरही अनेक वर्षानंतरही अनुभव केल्या जात राहतो.

• • •



# बापांनो, आपल्या मुलांबरोबर वेळ घालवा

**- क्लेरेंस डिलोच जूनि**

"**बा**पांनो, तुम्ही आपल्या मुलांना चिरडीस आणू नका; तर प्रभूच्या शिस्तीत व शिक्षणात त्यांना वाढवा." (इफिसकरास पत्र ६:४). आपल्या लेकरांबरोबर वेळ घालविलेल्या क्षणामधून काही सर्वात किमती क्षण ते होते की त्यांचे तुटलेले खेळणे दुरूस्त करत होते. मला दु:ख या गोष्टीचे आहे की, ती वेळ पुरेशी नव्हती.

मला वाटत नाही की, अनेक बाप जर त्यांना पुन्हा आपल्या लेकरांबरोबर वेळ घालवावी लागेल तर ते वेळ वाचवू इच्छितील. आज वेळ आधीपेक्षा फार व्यस्त झाला आहे. आम्हाला बेकार वस्तूंना सोडणे आणि महत्त्वपूर्ण गोष्टींना प्राथमिकता देण्यास शिकणे आवश्यक आहे. एक उत्तम पुस्तक ट्रेटस ऑफ हेल्दी फॅमिली मध्ये डॅलस कॅरून म्हणते की, "पारिवारिक जीवनाच्या सर्वात मोठ्या शत्रूमधून एक शत्रू एकत्र वेळ न घालविणे आहे." एका अध्ययनावरून माहिती झाली की, बाप आपल्या

लेकरांबरोबर आठवड्यातून फक्त दहा मिनिट घालवतात.

कधीकाळी बाप आपल्या लेकरांना खूप वेळ देऊ शकत होते. परंतु आता समय बदलला आहे. तेव्हा परिवाराचे लोक एकत्र काम आणि एकत्र खेळत होते. परंतु आता प्रत्येकाची जीवनाची दिशा आपली आपली आहे. ह्याचा अर्थ हा झाला की, एकत्र समय घालविण्यासाठी विचारपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. जाणूनबुजून प्रयत्न करणे आवश्यक आहे. हे आपोआपच होणार नाही परंतु ह्याच्यासाठी योजना बनवावी लागेल.

पुष्कळ वर्षापूर्वी डॉ. चार्ली शैड यांनी एक "निटनेटका बाप" एक प्रतियोगिता सादर केली होती. प्रतियोगीतेमध्ये आपआपल्या बापाची शिफारस करायला सांगितले होते. खाली बापामधून सर्वात आवडते दहा गुणांची यादी दिल्या गेली आहे.

१) तो माझ्यासाठी वेळ काढतो.

२) तो माझ्या गोष्टींवर लक्ष देतो.

३) तो माझ्या संगती खेळतो.

४) तो मला त्याची मदत करू देतो.

५) तो मला त्याच्यासोबत चालायला सांगतो.

६) तो माझ्या मनाची गोष्ट ऐकतो.

७) तो माझ्या मित्रांबरोबर चांगला आहे.

९) तो मला दंड तेव्हाच देतो जेव्हा मी काही चूक करीतो.

१०) तो त्याची चूक मानायला कचरत नाही.

एकत्र समय घालविल्याशिवाय आम्ही आपल्याच हृदयात अनोळखी बनून जातो. जे तुम्ही आता बाप आहात वरील यादीचे परीक्षण करा. देव बाप तुम्हाला सहाय्य करो. आमेन.

● ● ●

# देवाची शस्त्रसामग्री

**- जॉन गिपसन**

**प**वित्र शास्त्र, सैतानाला ठकविणारा (प्रकटीकरण १२:९) खोटा, लबाड (योहान ८:४४), वर्चस्व गाजविणारा (दुसरे करिंथकरास पत्र २:११), चतूर (करिंथकरास दुसरे पत्र ११:३), दुष्ट (योहानाचे पहिले पत्र २:१३), गर्वाने फुगलेला(तिमथ्याला पहिले पत्र ३:६), अधिपति (इफिसकरास पत्र २:२), नाश करणारा (लूक ८:१२) आणि देवाचा विरोधी (पेत्राचे पहिले पत्र ५:८) दाखवते.

सैतानाच्या शक्ती आणि प्रभावापासून वाचण्यासाठी आम्हाला वारंवार चेतावनी दिल्या गेली आहे. जर सैतानाची गोष्ट ऐकू तर सदा सर्वदासाठी आमचा नाश होईल आणि आम्ही सदा सर्वदासाठी नरकामध्ये जाऊ. परंतु पुन्हा "शरीर आणि रक्त"च्या कारणाने सैतान जरी आमच्यापेक्षा शक्तीमान आहे तर पुन्हा परमेश्वराच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सैतानाबरोबर लढण्यासाठी देवाच्या निर्देशनाला मानू या. जे इफिसकरास पत्र ६:१०-१८ मध्ये दाखविले आहे. पौल म्हणतो, "शेवटी प्रभूमध्ये व त्याच्या प्रभावी सामर्थ्याने बलवान होत जा. सैतानाच्या डावपेचापुढे तुम्हाला टिकाव धरता यावा म्हणून देवाची शस्त्र सामग्री धारण करा. कारण आपले झगडणे

रक्तमांसाबरोबर नव्हे, तर सत्तांबरोबर, अधिकाऱ्याबरोबर संध्याच्या काळोखातील जगाच्या अधिपतीबरोबर, आकाशातील दुरात्म्याबरोबर आहे. ह्या कारणास्तव तुम्हाला वाईट दिवसात प्रतिकार करता यावा व सर्व काही केल्यावर टिकाव धरता यावा म्हणून देवाची शस्त्रसामग्री घ्या तर मग आपली कंबर सत्याने कसा. नीतिमत्वाचे उरस्त्राण धारण करा, शांतीच्या सुवार्तेने लाभलेली सिद्धता पायी चढवा आणि ह्या सर्वांबरोबरच जिच्या योगे त्या दुष्टाचे सगळे जळते बाण तुम्हाला विझविता येतील, ती विश्वासाची ढाल हाती घ्या व उभे रहा. तारणाचे शिरस्त्राण व आत्म्याची तरवार म्हणजे देवाचे वचन, ही घ्या; सर्व प्रकारची प्रार्थना व विनवणी करा. सर्व प्रसंगी आत्म्याच्या प्रेरणेने प्रार्थना करा आणि ह्या कामी पूर्ण तत्परतेने व सर्व पवित्र जनासाठी विनवणी करीत जागृत रहा.''

हत्या, व्यभिचार, लेकरांवर अत्याचार, विनाश, युद्ध, घृणा, मूर्तीपूजा, नशा ह्यासारख्या सैतानाच्या कामगिरीला सर्व ठिकाणी पाहायला मिळते. मनुष्य ह्या समस्यावर नियंत्रण करण्याचा प्रयत्न तर करतो परंतु त्याचा काही निकाल लागत नाही. यावर नियंत्रण करण्यासाठी फार सोप्या शस्त्र सामग्रीची आवश्यकता आहे. ही शस्त्रसामग्री देवाकडून आहे म्हणून ही शस्त्रसामग्री शक्तीशाली आणि परिणमाकारक आहे. हे शस्त्र आहे सत्य, चांगुलपणा, शांतीच्या सुवार्तेची तयारी, विश्वास, तारण, परमेश्वराचे वचन, प्रार्थना, संयम आणि सावधानी.

जर आम्ही देवावर आणि त्याच्या सामर्थ्यावर विश्वास ठेऊ तर सैतानाला हरवू शकतो. केवळ ह्याच विश्वासाने आम्हाला विजयाचा भरवसा मिळू शकतो.

ही गोष्ट ठीक आहे की आज प्रत्येक प्रकारच्या शिक्षणाची लाट वाहत आहे ज्यामुळे पुष्कळशा लोकांच्या मनात खळबळ होऊन जाते. माझा सल्ला आहे की तुमच्या विचाराला आणि समज ह्यांना बाजूला ठेवा

आणि पवित्र शास्त्राचे अध्ययन करा. या आणि पहा की पवित्र शास्त्र काय सांगते. "मग परमेश्वर देव बोलला, मनुष्य एकटा असावा हे बरे नाही तर त्याच्यासाठी अनुरूप सहाय्यक मी करीन." (उत्पत्ती २:१८) यासाठी त्याने विवाहसंस्था स्थापन केली व त्याला आदरनीय केले. (इब्री लोकास पत्र १३:४) पौलाने मानले की लग्न देवाची रचना आहे आणि हे "चांगले" आहे. (तिमथ्याला पहिले पत्र ४:४). हे परमेश्वराच्या शस्त्राची कामगिरी आहे म्हणून यावरून मनुष्याला काहीच अधिकार नाही की तो त्याच्या समजुतीने ह्याला भंग करेल. म्हणून (मत्तय १९:६). आरंभापासूनच देव सुटपत्राच्या बाजूने नव्हता परंतु मनुष्याच्या कठोर मनाच्या कारणाने त्याने सुटपत्राची परवानगी दिली (मत्तय १९:७-८). विवाहाच्या संबंधाला बिगडविण्याची अनुमति दिली नाही. या संबंधाला तोडण्यासाठी केवळ दोनच कारण होते. ज्यामध्ये तर एक मृत्यू आहे. (रोमकरास पत्र ७:२) आणि दुसरा व्यभिचार. (मत्तय १९:९). या संबंधाला खराब करणे एक पाप आहे आणि दुसऱ्यांदा लग्न करणे हे दुसरे पाप आहे.

मत्तय १९:३-९ आणि मत्तय ५:३१-३२ मध्ये दुसरे लग्न करणे संबंधी पूर्ण विस्तारामध्ये सांगितले आहे. सोप्या रितीने जर कोणी पतीपत्नी वर दिल्या गेलेल्या कारणाने (व्यभिचार) सूटपत्र करून घेतो तर ते दुसऱ्यांदा लग्न करण्याचा अधिकार मागत आहेत. त्यांना एकटे राहिले पाहिजे नाहीतर ते दुसऱ्यासोबत राहून व्यभिचार करतील. ज्याचा त्यांना अधिकार नाही. व्यभिचाराचा सरळ अर्थ आहे "अवैध शारीरिक संबंध". अवैधचा अर्थ येथे देवाच्या नियमाच्या विरुद्ध आहे. वर दाखविलेल्या वचनाने आम्हाला माहिती मिळते की, एकाने दुसऱ्याविरुद्ध व्यभिचार केला आहे तर "पीडित" पक्षाला लग्न करायची मोकळीक आहे. पुष्कळशा बाबींमध्ये व्यभिचार आणि आत्म्याच्या विनाशाकडे जाण्याऐवजी चूक सुधारून विवाहाला कायम ठेवणे सोपे होते (करिंथकरास पहिले पत्र ६:९). ● ● ●

# गर्भपात-एक ख्रिस्ती व्यक्तीच्या नजरेत

**- माईकल एल. किंग**

आम्हाला आठवण असायला पाहिजे की, आम्हाला हे जीवन परमेश्वराकडून दानाच्या रूपात मिळाले आहे (प्रेषितांची कृत्ये १७:२५). आम्हाला "देवाच्या प्रतिरूपाचे बनविले आहे" (उत्पत्ती १:२६). यासाठी की मानवी जीवन अन्य सर्व जीवापेक्षा श्रेष्ठ आहे. याच घोषणेमुळे मनुष्याचा देवाबरोबर संबंध आहे. या कारणाने कधीही मनुष्याला आपल्या मित्र मनुष्याचा वध करण्याचा अधिकार दिला गेला नाही. कारण त्याला देवाच्या प्रतिरूपाचा (उत्पत्ती ९:६) रचल्या गेले आहे.

जीवनाच्या पवित्रतेच्या विषयामध्ये येशूने पृथ्वीच्या लोकांना वाचविण्यासाठी स्वर्गाची सर्वात उत्तम वस्तू अर्थातच आपल्या प्राणाला देऊन हे दाखवले आहे. (योहान ३:१६, योहानाचे पहिले पत्र ३:१६). प्रत्येकासाठी ही आज्ञा की तो सुवार्ता ऐकून तारण पावेल हे सिद्ध करते की परमेश्वर एका प्राणाला किती महत्त्व देतो. (मार्क १६:१५,१६)

पवित्र शास्त्रामध्ये जन्माच्या आधी व जन्माच्या नंतर काही अंतर केल्या गेले नाही. परमेश्वराने यिर्मयाला म्हटले, "मी तुला गर्भाशयात घडविले त्यापूर्वी तू मला ठाऊक होतास तू उदरातून निघाल्यापूर्वी मी तुला

पवित्र केले. मी तुला राष्ट्राचा संदेष्टा नेमिले आहे" (यिर्मया १:५). आमच्या प्रभूची आई मरियाने अलीशबेला अभिवादन केले तेव्हा योहान बाप्तिस्मा देणाऱ्याने आपल्या आईच्या पोटात उडी मारली. (लूक १:४१).

दाविद राजा म्हणतो की,"भयप्रद व अद्‌भूत रितीने माझी घडण झाली आहे. म्हणून मी तुझे उपकार स्मरण करितो, तुझी कृत्ये अद्‌भूत आहेत हे माझा जीव पूर्णपणे जाणून आहे. मी गुप्त स्थळी निर्माण होत असता आणि पृथ्वीच्या अधोभागी विलक्षण प्रकारे माझी घडण होत असतांना माझी आकृती तुला गुप्त नव्हती. मी गर्भात पिंडरूपाने असतांना तुझ्या नेत्रांनी मला पाहिले आणि माझा एकही दिवस उगवण्यापूर्वी ते सर्व तुझ्या वहीत नमूद करून ठेविले होते" (स्तोत्रसंहिता १३९:१४-१६).

पौलाने चेतावनी दिली की, "तुम्ही कोणीही आपलेच हित पाहू नका, तर दुसऱ्याचेही पहा. (फिलिप्पैकरास पत्र २:४) गर्भपाताचा आधार स्वार्थच आहे आणि पाप आहे.

• • •

जीवनाच्या पवित्रतेच्या विषयामध्ये येशूने पृथ्वीच्या लोकांना वाचविण्यासाठी स्वर्गाची सर्वात उत्तम वस्तू अर्थातच आपल्या प्राणाला देऊन हे दाखवले आहे. (योहान ३:१६, योहानाचे पहिले पत्र ३:१६).

# काही न करण्याचे पाप

- जॉन स्टेसी

**आ**मच्या जीवनात प्रत्येक दिवशी असा समय येतो जेव्हा परमेश्वर आम्हाला अशी संधी देतो की ज्यामध्ये आम्ही दुसऱ्यांना येशूबद्दल सांगू शकू. परंतु सहसा असे होते की, जर या सुवर्णसंधीचा लाभ उचलला नाही तर ते दुसऱ्यांदा भेटणार नाही. यामध्ये काही संशय नाही की एक ख्रिस्ती व्यक्ती आपल्या जीवनात एक फार मोठी चूक हीच करतो की तो आपल्या जीवनाद्वारे कोणालाही येशूजवळ आणत नाही. हा एक वास्तविक आध्यात्मिक धोका आहे आणि पुष्कळांच्या जीवनात तो आढळतो.

मत्तय २५:१-३० मध्ये येशूने लोकांना त्या व्यक्तीबद्दल सांगितले होते ज्याला एक हजार रूपये दिले होते या धनाचा आज हिशोब केला तर ते हजार रूपये जवळ जवळ ११,००० रूपयाचे होते. ह्या दाखल्यामध्ये आपण आणखी दोन सेवकाबद्दल वाचतो. ज्यांनी आपल्या स्वामीच्या लाभासाठी आपल्या पैशाचा उपयोग केला होता. परंतु ज्याला एक हजार मिळाले होते त्याने ते जमिनीमध्ये लपवून ठेवले आणि त्याचा उपयोग केला नाही. जेव्हा त्यांचा स्वामी परत आला आणि माहीत झाले की त्या सेवकाने त्याच्यासाठी काहीच कमविले नाही तर त्याने म्हटले, "ह्या निरूपयोगी

दासाला बाहेरील अंधारात टाका, जेथे रडणे व दात खाणे चालेल." ह्या दासाने हा पैसा दारू आणि वाईट गोष्टीमध्ये उडविला नव्हता परंतु त्याचा दोष हा होता की, जे एक हजार त्याच्या मालकाने त्याला दिले होते त्याकडून त्या पैशाकडून त्याने आपल्या स्वामीसाठी काहीच कमविले नव्हते. ह्या दृष्टांतावरून जो धडा आपल्याला समजतो तो हा आहे की जे काही आमच्याजवळ आहे ते सर्व परमेश्वराकडूनच मिळाले आहे. आम्ही आमच्या गुणांचा आणि वस्तूंचा आपल्या स्वामीसाठी उपयोग करावा. कारण आपल्याला माहीत आहे की तो एक दिवस परत येणार आहे आणि आमच्याकडून आमच्या जीवनाचा आणि त्या सर्व वस्तूंचा ज्या त्याने आम्हाला दिल्या आहेत हिशोब घेईल.

नंतर लूक १३:६-९ मध्ये आम्ही एका सुकलेल्या अंजीराच्या झाडाविषयी वाचतो. यामध्ये एका अशा व्यक्तीबद्दल वाचतो जो अंजीराच्या झाडावर फळ पाहावयास येतो परंतु त्यामध्ये फळ आढळत नाही म्हणून त्याने आपल्या सेवकाला म्हटले की काही वेळेसाठी ह्या वृक्षाची काळजी घे आणि जर ह्याला फळ आले नाही तर ते तोडून टाक. या झाडाला यासाठी तोडल्या जात नव्हते की त्याला कीड लागलेले फळ यायचे परंतु यासाठी तोडण्यात येत होते की, त्याला फळ येतच नव्हते. यावरून हा धडा मिळतो की न्यायाच्या दिवशी जर फळाशिवाय आम्ही परमेश्वरापुढे जाऊ तर यासाठी आम्ही दोषी ठरू. आम्ही काही न करण्याच्या कारणाने दोषी ठरू.

लूक १०:३०-३९ मध्ये प्रभूने चांगल्या शोमरोन्याचा दृष्टांत सांगितला आहे. या दृष्टांतामध्ये सांगितले आहे की काही लुटारूंनी एका मनुष्याला मारहाण केली आणि त्याचे कपडे काढून घेऊन त्याला अर्धमेला टाकून त्याचे सर्वकाही लुटून त्याला रस्त्यात फेकून निघून गेले. पुढे आम्ही वाचतो की, त्याच वाटेने एक याजक आणि लेवी जात होते. त्यांनी त्या संकटामध्ये पडलेल्या व्यक्तीला पाहिले परंतु त्याची काही मदत केली नाही.

हे लोक दुसऱ्या लोकांपेक्षा वेगळे होते. परंतु मग आम्ही त्या चांगल्या शोमरोन्याविषयी वाचतो. जो तेथे थांबून त्या मनुष्याजवळ गेला आणि प्रत्येक प्रकारे त्याची मदत केली. आम्ही कामी याजक आणि लेवीबद्दल वाचतो, आम्हाला माहिती मिळते की त्यांनी त्याला मारहाण केली नव्हती आणि त्याचे काही वाईट केले नव्हते परंतु त्यांचा दोष हा होता की त्यांनी काहीच केले नाही ज्याकडून दु:खात पडलेल्याला मदत मिळेल. हे दोघे (याजक आणि लेवी) काही न करण्याच्या पापाचे दोषी होते. ज्या शोमरोन्याने त्या व्यक्तीची मदत केली होती, त्याच्यासाठी येशूने म्हटले की तो एक चांगला शेजारी आहे.

आम्हाला हा विचार करायचा नाही की काही न करण्यासाठी आम्ही दोषी ठरणार नाही. योकोबाचे पत्र १:२२ दाखवते की, ''वचनाप्रमाणे आचरण करणारे असा, केवळ ऐकणारे असू नका, अशाने तुम्ही स्वत:ची फसवणूक करिता.'' जेव्हा तुम्ही प्रभूच्यासमोर न्यायाच्या दिवशी उभे राहाल तेव्हा हेच वचन न्यायाच्या दिवशी पुष्कळशा लोकांना दोषी ठरवेल हे पण लक्षात ठेवा की याकोबाचे पत्र ४:१७ मध्ये याकोब दाखवतो की, ''चांगले करणे कळत असून जो ते करीत नाही त्याचे ते पाप आहे.''

• • •

**गर्दीपासून वेगळे व्हायला तयार व्हा :**

''अरूंद दरवाज्याने आत जा. कारण नाशाकडे जाण्याचा दरवाजा रूंद व मार्ग पसरट आहे आणि त्यातून आत जाणारे पुष्कळ आहेत. परंतु जीवनाकडे जाण्याचा दरवाजा अरूंद व मार्ग संकोचित आहे आणि ज्यांना तो सापडतो ते थोडके आहेत.'' (मत्तय ७:१३-१४)

# जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी आहे

- फ्रान्सिस डेव्हिड

प्रेषित पौलाने ख्रिस्ती लोकांना लिहून म्हटले होते, "म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी आहे तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले; पहा, ते नवे झाले आहे" (करिंथकरास दुसरे पत्र ५:१७). ज्या लोकांनी सुवार्तेच्या आज्ञेला मानून बाप्तिस्मा घेतला होता, ते लोक प्रभू येशूमध्ये नवीन बनले होते कारण त्यांनी पापमय जीवनाला बाप्तिस्म्याद्वारे पाण्याच्या कबरेमध्ये गाडले होते. या विषयी आपण रोमकरास पत्र ह्याच्या सहाव्या अध्यायामध्ये वाचतो. "आपण जितक्यांनी ख्रिस्त येशूमध्ये बाप्तिस्मा घेतला, तितक्यांनी त्याच्या मरणात बाप्तिस्मा घेतला, या विषयी तुम्ही अजान आहा काय ?" तर मग आपण त्या मरणातील बाप्तिस्माने त्याच्याबरोबर पुरले गेलो; ह्यासाठी की ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवाने मेलेल्यातून उठला, त्याचप्रमाणे आपणही नवीन प्रकारच्या जीवनात चालावे कारण जर आपण त्याच्या मरणाच्या प्रतिरूपाने त्याच्याशी संयुक्त झालो आहो तर त्याच्या उठण्याच्याही प्रतिरूपाने त्याच्याशी संयुक्त होऊ."(रोमकरास पत्र ६:३-५)

जेव्हा कोणी एखादी व्यक्ती प्रभूची आज्ञा मानून बाप्तिस्मा घेते, तर त्याचे जीवन बदलून जाते. अर्थातच तो एक नवीन मनुष्य बनून जातो.

आमचे जुने मनुष्यत्व समाप्त होऊ जाते आणि आम्ही एका नवीन जीवनाची सुरूवात करतो. प्रेषित पौल लिहितो "कारण जर तुम्ही देहस्वभावाप्रमाणे जगलात तर तुम्ही मरणार आहा, परंतु जर तुम्ही आत्म्याने शरीराची कर्मे ठार मारलीत तर जगाल" (रोमकरास पत्र ८:१३).

एक ख्रिस्ती व्यक्ती आपल्या जुन्या आचरणाचा जो जुना मनुष्य त्याचा त्याग करतो (इफिसकरास पत्र ४:२२) आणि तो आपल्या आत्मिक स्वभावामध्ये नवीन बनल्या जातो. कारण तो नवीन मनुष्यत्वाला धारण करतो. (वचन २२,२३)

कित्येक लोक येशूवर विश्वास ठेऊन बाप्तिस्मा तर घेतात परंतु त्यांच्या जीवनामध्ये काहीच बदल होत नाही. परमेश्वर या गोष्टीकडून प्रसन्न होत नाही आणि ह्याचे मुख्य कारण हे आहे की ते लोक खऱ्या हृदयाने येशूजवळ येत नाहीत. तसेच ते आपल्या जुन्या जीवनाला सोडू इच्छित नाही. मित्रहो, जर कोणी व्यक्ती बाप्तिस्मा घेतो तो आपल्या जुन्या घाणेरड्या कार्याला मारून टाकतो. प्रेषित पौलाने म्हटले होते, "म्हणून तुम्ही ख्रिस्ताबरोबर उठविले गेला आहा तर ख्रिस्त देवाच्या उजवीकडे जेथे बसला आहे, तेथल्या वरील गोष्टी मिळविण्याचा यत्न करा. वरील गोष्टीकडे मन लावा. पृथ्वीवरील गोष्टीकडे लावू नका. कारण तुम्ही मृत झाला आहा आणि तुमचे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले आहे. आपले जीवन जो ख्रिस्त तो प्रगट केला जाईल तेव्हा तुम्हीही त्याच्याबरोबर गौरवात प्रगट केले जाल तर पृथ्वीवरील तुमचे अवयव म्हणजे जारकर्म, अमंगळपणा, कामवासना, कुवासना व लोभ ह्याला मूर्तीपूजा म्हणावे हे जीवे मारा." (कलस्सैकरास पत्र ३:१५)

ह्याच अध्यायात तो पुढे म्हणतो की, ख्रिस्ती बनण्याच्या आधी पहिले तुम्ही वाईटामध्ये जिवंत होता आणि वाईटाने भरलेले जीवन जगत होता. म्हणजे तुमचे जुने जीवन, क्रोध, संताप, दुष्टपणा, निंदा व शिवीगाळ ह्यांनी भरलेले होते; परंतु आता येशूचे शिष्य बनल्यामुळे तुमचे वाईटाने

भरलेले जीवन समाप्त झालेले आहे (कलस्सैकरास पत्र ३:७-१०). आम्ही ह्या जगात राहतो म्हणून जगाच्या वाईटामध्ये भाग घेऊ शकत नाही. एक ख्रिस्ती व्यक्ती नेहमी हा प्रयत्न करतो की परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे वागावे. योहानाने याप्रकारे लिहिले होते, "जगावर व जगातल्या गोष्टीवर प्रीती करू नका जर कोणी जगावर प्रीती करीत असेल तर त्याच्या ठायी पित्याची प्रीती नाही कारण जगात जे सर्व आहे ते म्हणजे देहाची वासना, डोळ्याची वासना व संसाराविषयीची फुशारकी ही पित्यापासून नाहीत तर जगापासून आहेत आणि जग व त्याची वासना नाहीशी होत आहेत, पण देवाच्या इच्छेप्रमाणे करणारा सर्वकाळ राहतो. (योहानाचे पहिले पत्र २:१५-१७).

आज जग वाईटाने भरलेले आहे. आमच्या चारही दिशेने खूप पुष्कळ वाईटपणा पाहायला मिळतो. लोक आध्यात्मिक गोष्टीमध्ये आपली रूची, आवड दाखवत नाहीत. धार्मिक गोष्टीवर काही लक्ष दिल्या जात नाही. पवित्र शास्त्रात आम्ही वाचतो की, फार पूर्वी ही भविष्यवाणी केल्या गेली होती. असा कठीण समय येईल की लोक अशा प्रकारच्या वाईट गोष्टीवर आपले मन लावतील. (तिमथ्याला दुसरे पत्र ३). चांगल्या नैतिक जीवनाला काही महत्त्व दिल्या जात नाही. व्यभिचार ही एक बाब होऊन गेली आहे. समलैंगिक संबंधाला काही वाईट गोष्ट समजत नाही, दारू पिणे एक लाईफ स्टाईल मानल्या जाते. वृद्ध लोकांना आदर, सन्मान दिल्या जात नाही. आईबापाची आज्ञा मानायला काही महत्त्व दिल्या जात नाही.आणखीही अशा अनेक वाईट गोष्टींना ज्या आपण आपल्या आजूबाजूला पाहतो. पवित्रशास्त्र ह्या सर्व वाईट गोष्टींचा विरोध करते.

प्रिय मित्रांनो, काय तुम्ही जुन्या मनुष्यत्वाला काढून टाकले आहे? जर नाही तर मी तुम्हाला दाखवू इच्छितो की तुम्ही येशूमध्ये एक नवी उत्पत्ती बनू शकता. त्याच्यावर विश्वास ठेवून, वाईटासाठी पश्चात्ताप करा व बाप्तिस्मा द्या. (मार्क १६:१६, प्रेषितांची कृत्ये २:३८). तुमचे जीवन येशूमध्ये नवीन बनून जाईल. • • •

# पवित्रशास्त्र टॅटू बनविणे, शरीरावर गोंदवून घेण्याच्याविषयी काय सांगते ?

- बेन जोन्स्

जुन्या कराराच्या व्यवस्थेमध्ये इस्त्राएलांना आज्ञा होती, ''कोणी मृत झाल्यामुळे आपल्या अंगावर वार करून घेऊ नका किंवा आपले अंग गोंदवून घेऊ नका; मी परमेश्वर आहे''. (लेवीय १९:२८). म्हणून आजच्या विश्वासी लोकांसाठी जे जुन्या कराराच्या व्यवस्थेच्या अधीन नाहीत (रोमकरास पत्र १०:४, गलतीकरास पत्र ३:२३-२५, इफिसकरास पत्र २:१५) या त्यांच्यासाठी काही प्रश्न उपस्थित झाले पाहिजे. नवा करार यावर काही म्हणत नाही की, विश्वास ठेवणाऱ्यांनीही टॅटू बनवायला पाहिजे किंवा नाही.

पेत्राचे पहिले पत्र ३:३-४ मध्ये ही आज्ञा अवश्यक मिळते, ''तुमची शोभा केसांचे गुंफणे, सोन्याचे दागिने घालणे किंवा उंची पोषाख करणारे हयात बाहेरून दिसणारी नसावी तर तो सौम्य व शांत आत्मा देवाच्या दृष्टीने बहुमूल्य आहे. त्याची म्हणजे अंत:करणातील गुप्त मुनष्यपणाची व अविनाशी शोभा असावी''. हे वचन ख्रिस्ती स्त्रियांसाठी आहे, परंतु ह्यामध्ये एक सिद्धांत आहे जो ह्याच्याशी मिळताजुळता असू शकतो की बाहेरील रूप आमच्या ध्यानाचे केंद्र व्हायला नको. अधिक तर प्रयत्न ''केस गुंफणे''

आणि "भारी वस्त्र आणि दागिण्यामध्ये जाते. परंतु स्त्रीची वास्तविक सुंदरता यामध्ये नाही. याचप्रमाणे टॅटू आणि शरीर गोंदणे "दिखावटी श्रृंगार आहे. स्त्री असो किंवा पुरुष आम्हाला आंतरिक सजावटीला प्रेरीत करण्यास जोर दिला पाहिजे."

टॅटू आणि शरीर गोंदवून घेण्याच्या संबंधात एक उत्तम प्रदर्शन आहे की प्रामाणिकपणे, इमानदारीने, शुद्ध विवेकाने आम्ही परमेश्वराला म्हणू की तो आमची त्या विशेष गतिविधींना आशीर्वादीत करो आणि त्याचा उपयोग आपल्या चांगल्या उद्देशासाठी करावा. म्हणून तुम्ही खाता किंवा पिता किंवा जे काही करिता ते सर्व देवाच्या गौरवासाठी करा. (करिंथकरास पहिले पत्र १०:३१). नवा करार विशेष रूपाने टॅटू किंवा शरीराला गोंदण्याच्या संबंधात काहीच म्हणत नाही. परंतु हा आम्हाला ह्या गोष्टीला मान्य करण्याचे काही कारणही देत नाही की आम्ही टॅटू बनविणे किंवा शरीराला गोंदवून घ्यावे.

ज्या मुद्यावर पवित्रशास्त्र स्पष्ट दाखवत नाही की त्यामध्ये काय करायचे तेथे पवित्रशास्त्रचा महत्वपूर्ण नियम हा आहे की जर यामध्ये काही संदेह आहे की हे परमेश्वराला पसंत येईल किंवा नाही, तर चांगले हे आहे की, त्या गतिविधीमध्ये सहभागीच न व्हावे. रोमकरास पत्र १४:२३ आम्हाला आठवण देते की, आणि जे काही विश्वासाने नाही ते पाप आहे. आम्हाला आठवण ठेवणे आवश्यक आहे. करिंथकरास पहिले पत्र ६:१९-२० मध्ये सरळ टॅटू बनविणे किंवा शरीरावर गोंदवणे या संबंधी तर नाही, परंतु यामध्ये आमच्यासाठी एक नियम आहे. "म्हणून तुम्ही आपल्या शरीराने देवाचे गौरव करा. आपल्या शरीराद्वारे आपण जे करितो किंवा जेथे जातो त्या सर्वामध्ये आम्हाला ह्या मोठ्या सत्याला ध्यानात ठेवणे आवश्यक आहे, जर आमचे शरीर परमेश्वराचे आहे तर आम्हाला पाहिजे की हे सुनिश्चित करा की टॅटू बनविणे किंवा शरीरावर गोदंवणे किंवा "चिरणे" या आधी की आम्हाला त्याची "परवानगी" आहे किंवा नाही.

● ● ●

# येशूचा शोध

- डेविड रोपर

पवित्र शास्त्र दर्शविते की, आरंभापासून परमेश्वराकडून तारणकर्त्याच्या येण्याची घोषणा करणे, त्याचा संकेत देणे आणि त्याच्या येण्याच्या तयारीचे आरंभ केल्यानंतर लोकांना त्याचा कोणत्या ना कोणत्या रूपात शोध राहिला आहे. जुन्या कराराच्या आरंभापासून नवीन कराराच्या अंतापर्यंत तुम्हाला पाहायला मिळेल की पवित्र शास्त्राच्या प्रत्येक पुस्तकात येशू आढळतो. जुन्या करारातील लोक त्याला अज्ञानतेमध्ये शोधीत होते. आपल्या समायातील लोकांना येशूने म्हटले, "तुम्ही शास्त्रलेख शोधून पाहता कारण त्याच्याद्वारे तुम्हाला सार्वकालिक जीवन प्राप्त होईल असे तुम्हाला वाटते आणि तेच माझ्याविषयी साक्ष देणारे आहेत."... (योहान ५:३९,४०). याचा अर्थ असा की परमेश्वराद्वारे दिल्या गेलेले वचन त्यावेळेस दिल्या गेलेले येशूच्या त्यांच्या शोधामध्ये प्रेरणेचे कारण होते.

योहान ४ थ्या अध्यायामध्ये शोमरोनी स्त्रीला जेव्हा माहीत झाले येशू हाच तो ख्रिस्त आहे ज्याची वाट त्यांचे वडील, आजोबा पाहत मरण पावले होते. ती धावत जाऊन नगरात गेली आणि लोकांना सांगत होती की तिला ख्रिस्त भेटला आहे. जेव्हा तिची ही गोष्ट ऐकून ते प्रभूकडे आले,

त्यांनीही विश्वास ठेवला की खरोखर हाच ख्रिस्त आहे. इतकेच नाही तर ते त्या स्त्रीला म्हणाले "आता तुझ्या बोलण्यावरूनच आम्ही विश्वास धरतो असे नाही, कारण आम्ही स्वत: ऐकले आहे व हा खचित खचित जगाचा तारणाचा आहे हे आम्हाला कळले आहे" (योहान ४:४२)

त्याच्या जन्मानंतर त्याच्या शोधात पूर्वेकडून आलेले विद्वान पण होते जे हे माहीत झाल्यावर की कोणत्या राजाचा जन्म झाला आहे, त्याच्या दर्शनाला गेले होते. त्यांनी आकाशामध्ये त्याचा तारा पाहिला होता. तो तारा त्यांच्या पुढे पुढे चालत होता आणि ते त्या ताऱ्याच्या मागे मागे चालत गेले, की याचा विचार करत की राजाचा जन्म राजाच्या घरातच झाला असेल. ते येरूशलेममध्ये विचारण्यासाठी राजाजवळ जाऊन पोहचले.

राजाच्या घरी त्याची माहिती न मिळाल्यामुळे राजाला भिती वाटली की त्याचा कोणी शत्रू तर उभा राहिला नाही. राजानेही बालक येशूचा शोध घेतला. ही गोष्ट वेगळी आहे की राजाने येशूचा शोध त्याला ठार मारण्यासाठी केला. येशूला ठार मारण्यासाठी तो यशस्वी झाला नाही, परंतु त्या ठिकाणचे दोन वर्षाचे किंवा त्याच्या जवळपास वयातील लेकरांना ठार मारून पुष्कळशा मातांची कोख उजाडली होती.

त्या देशातील काही मेंढपाळांनाही स्वर्गदुतांनी दर्शन देऊन सांगितले होते की,"...... तुमच्यासाठी आज दाविदाच्या गावात तारणारा जन्मला आहे; तो ख्रिस्त प्रभू आहे" (लूक २:११). हे लोक साधारण लोक होते आणि विद्वान पण नव्हते. स्वर्गदूताच्या गोष्टीकडून समजते की तारणारा त्यांच्यासाठी पण होता आणि स्वर्गदूतांची गोष्ट ऐकून त्यांना त्याचे दर्शन मिळाले आणि लोकांना या आनंदाची सुवार्ता सांगितली.

आम्ही पाहतो की, आरंभपासूनच येशूचा शोध पुष्कळशा रितीने केल्या जात होता. खरे पाहिले असता त्याचे नाव ख्रिस्त, त्याला येशू हे नाव दिले होते. ख्रिस्ताचा अर्थ आहे की तो मनुष्याच्या तारणासाठी परमेश्वराचा

निवडलेला असा आहे. पहा प्रेषितांची कृत्ये ४:१२ आणि येशूचा अर्थ आहे तारणारा. "स्वर्गदूतांनी योसेफाला सांगितले होते की, तिला पूत्र होईल आणि त्याचे नाव तू येशू असे ठेव. कारण तोच आपल्या प्रजेला त्यांच्या पापापासून तारील" (मत्तय १:२१) खरे पाहिले असता मनुष्याचा परमेश्वराबरोबर समेट करण्यासाठी अशा एका व्यक्तीची आवश्यकता होती.

सुवार्तेच्या आपल्या वृत्तांत योहान लिहितो की, "प्रारंभी शब्द होता, आणि शब्द देवासह होता आणि शब्द देव होता." आणि तोच शब्द, वचन देहधारी होऊन आम्हामध्ये आला आणि तो शब्द, वचन आमच्यामध्ये राहिला. तो आपल्यामध्ये म्हणजे यहूदियामध्ये जे परमेश्वराचे लोक म्हटल्या जात होते, परंतु स्वकियांनी त्याचा स्वीकार केला नाही. योहान लिहितो की, "परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला." परमेश्वराची इच्छा अशी आहे की, लोकांनी त्याच्याबरोबर सहभागिता ठेवावी आणि त्या तारणाला शोधावे जे त्याने मनुष्यासाठी उपलब्ध केलेले आहे. परंतु सैतानाची सदैव हीच इच्छा राहिली आहे की मनुष्याचा समेट परमेश्वराबरोबर होऊ नये.

आम्ही पाहतो की, हेरोदाने ही येशूचा शोध केला होता. वास्तविक तो शोध त्याच्याकडून नव्हता तर सैतानाकडून होता. त्याने प्रयत्न तर केला होता परंतु असफल झाला, कारण तो चुकीच्या इच्छेने येशूचा शोध करत होता.

आजही लोक येशूचा शोध वेगवेगळ्या रितीने करीत आहेत. परंतु आज खरोखर येशूकडून आशीर्वाद मिळविण्यासाठी आम्हाला पवित्र शास्त्रातील त्या विद्वानांकडून शिकून येशूचा शोध करून आम्हालाही त्यांच्या ओळीमध्ये उभे राहण्याची गरज आहे. लोक नाताळाच्या दिवसात एक तारा तयार करून हे दाखवण्याचा प्रयत्न करतात की ते पण येशूचा शोध करीत आहेत. परंतु प्रत्येक वर्षी ते पुन्हा त्या दिवशी तसे करून दाखवतात की तो

त्यांना भेटला नाही.

वास्तविक आमच्या तारणासाठी येशूचे भेटणे अति आवश्यक आहे. जर आपण पूर्वीच्या विद्वानांना आदर्श बनवू ज्यांनी आकाशात एक अद्भूत तारा पाहिला होता तर आम्हाला दुसरीकडे कोठे न जाता परंतु त्याच्या पवित्र शास्त्रात शोधायला पाहिजे. पवित्र शास्त्र खरोखर अद्भूत आहे. ज्याप्रकारे तो तारा या गोष्टीसाठी वेगळा होता, की तो त्यांच्या पुढे पुढे चालत होता. याच्या मागे मागे चालता चालता त्यांना येशूचा पत्ता मिळाला होता. येशूचा पत्ता मिळाल्यावर त्यांनी त्याला तसेच दंडवत केले जसे एका राजाला केल्या जाणार होते. त्यांनी त्याला आणलेली भेटवस्तू, सोने, ऊद व गंधरस त्याला भेट दिली. त्याला त्यांचे दंडवत करणे ही पण दाखवते की, तो यासाठी योग्य आहे की लोक त्याच्यापुढे नमन करितील.

● ● ●

त्या देशातील काही मेंढपाळांनाही स्वर्गदुतांनी दर्शन देऊन सांगितले होते की,"...... तुमच्यासाठी आज दाविदाच्या गावात तारणारा जन्मला आहे; तो ख्रिस्त प्रभू आहे"

(लूक २:११).

# उपासक

- सनी डेव्हिड

**दे**वाने निर्माण केलेल्या सृष्टीत मनुष्य हा असा एकच प्राणी आहे. जो की त्याची उपासना करू शकतो. परमेश्वराने मनुष्याला फक्त शरीरच दिले नाही तर त्याला एक आत्मा व बुद्धी दिली आहे. त्यामुळे तो विचार करून ठरवू शकतो की आपल्या निर्माण कर्त्याची उपासना करावी की नाही. जेव्हा मनुष्य परमेश्वराची उपासना करण्याचा निश्चय करतो तेव्हा तो स्तुतीस व सन्मानास कारण ठरतो.

मनुष्य स्वभावत:च उपासना करणारा प्राणी आहे. तो कोणत्याही प्राण्याची किंवा वस्तुची उपासना करू इच्छितो आणि त्याने नेहमी तसेच केले आहे. जोपर्यंत ही सृष्टी अस्तित्वात आहे तोपर्यंत मनुष्य असाच करत रहाणार आहे. जगाच्या निर्मितीपासून आज पर्यंत मनुष्य अशा वस्तुसमोर झुकत आलेला आहे ज्याची आपण कल्पना करू शकतो की, सूर्य, चंद्र, तारे, दगड, नद्या तसेच अशा अनेक वस्तू आहे. अशा प्रकारे कारागिराद्वारे बनविलेल्या लाकडी व दगडी मूर्त्या समोर मनुष्य नेहमी झुकत आलेला आहे परंतु जर मनुष्य उपासना करू इच्छितो तर त्याने परमेश्वराचीच उपासना करायला पाहिजे ज्याने त्याला बनविले आणि परमेश्वर अशाच उपासकाची उपासना मान्य करितो.

प्रभू येशूने शिकवितांना असे म्हटले की, "तरी खरे उपासक आत्म्याने व खरेपणाने पित्याची उपासना करितील अशी वेळ येत आहे. किंबहुना आलीच आहे. कारण आपले उपासक असे असावे अशीच पित्याची इच्छा आहे. देव आत्मा आहे आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे" (योहान ४:२२,२४) तर मनुष्याला फक्त उपासनाच करून चालत नाही तर ती उपासना देवाला मान्य असायला पाहिजे. म्हणजेच मनुष्याने उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे, जी की देवाला ग्रहनीय आहे.

**आम्ही सर्व खऱ्या व जिवंत परमेश्वराचे ज्ञान प्राप्त करू शकतो**

संपूर्ण सृष्टीचे लक्ष एकाच जग निर्मात्याकडे जाते. या गोष्टीचा नकार करता येत नाही आणि कोणता समजुतदार मनुष्य या गोष्टीचा नकार करू शकत नाही की ह्या सृष्टीचा जगाचा निर्माण करणारा आहे आणि आम्ही जाणतो की खरा व जिवंत परमेश्वरच ह्या सर्व वस्तूंचा बनविणारा आहे (उत्पत्ति १:१). "प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली."

सर्व सृष्टी परमेश्वराने निर्माण केली आणि जर त्याला वाटते की मानवाने त्याच्या इच्छेप्रमाणे चालावे तर तो आपली इच्छा मनुष्यावर प्रगट करू शकतो आणि हे खरे आहे. पवित्र शास्त्राद्वारे हे काम त्याने केले. "या पुस्तकात लिहिली नाहीत अशी पुष्कळ दुसरी चिन्हे येशूने आपल्या शिष्यादेखता केली. येशू हा देवाचा पुत्र ख्रिस्त आहे असा तुम्ही विश्वास धरावा आणि विश्वास धरून तुम्हाला त्याच्या नावाने जीवन प्राप्त व्हावे म्हणून ही वर्णिली आहेत" (योहान २०:३०,३१). "प्रत्येक ईश्वरप्रेरित शास्त्रलेख, सदबोध, दोष दाखविणे सुधारणूक, नीतिशिक्षण ह्याकरिता उपयोगी आहे. ह्यासाठी की, देवाचा भक्त पूर्ण होऊन प्रत्येक चांगल्या कामासाठी सज्ज व्हावा"(२ तिमथी ३:१६,१७).

परमेश्वराने आपले वचन प्रगट केले आणि पवित्र शास्त्राद्वारे आम्हाला दिले. अशासाठी की मनुष्याने ते समजावे त्याचे मनन करून ते ज्ञान प्राप्त करून घ्यावे. येशू ख्रिस्ताने आपल्या शिष्यांना सर्व सृष्टीला

जाऊन सुवार्तेची घोषणा करण्याची आज्ञा दिली (मार्क १६:१५,१६). नंतर त्याने असे पण म्हटले की, जे धार्मिकतेचे भुकेले व तहानले आहे ते तृप्त होतील (मत्तय ५:६) आणि असे ही लिहिले आहे "जितक्यानी त्याचा स्वीकार केला तितक्यास म्हणजे त्याच्या नामावर विश्वास ठेवणाऱ्यास त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला (योहान १:१२).

जेव्हा मनुष्य परमेश्वराचे वचन वाचतो व त्याचा अभ्यास करतो तेव्हा त्याच्या मनात विश्वास निर्माण होतो (रोम १०: १७) आणि ज्ञान प्राप्त करून व विश्वास ठेवून मनुष्य जेव्हा आज्ञा पाळतो तर त्याचा परिणाम उद्धार होतो(प्रेषित २:३८, १७:३०, इब्री ११:६)

आज्ञा पाळून तारण प्राप्त केल्यानंतर प्रभू त्या मनुष्याला आपल्या मंडळीत सहभागी करून घेतो व त्याला ख्रिस्ती हे नाव प्राप्त होते किंवा त्याला ख्रिस्ती म्हणतात (प्रेषित २:४७, ११:२६)

ख्रिस्ताच्या मंडळीचा सभासद किंवा एक ख्रिस्ती व्यक्ती झाल्यानंतरच मनुष्य उपासकाच्या योग्य होतो की प्रभूने सांगितल्याप्रमाणे तो उपासना करू शकतो. त्याच्या पहिले पवित्रशास्त्रा प्रमाणे त्याची उपासना होवू शकत नाही. कारण लिहिले आहे. "आपल्याला ठाऊक आहे की देव पापिष्ट लोकांचे ऐकत नाही तर जो कोणी देवभक्त असून त्याच्या इच्छेप्रमाणे वर्तता त्याचे तो ऐकतो (योहान ९:३१). लक्षात घ्या की, येथे दोन गोष्टीद्वारे प्रभू आमची प्रार्थना ऐकतो. पहिली मनुष्य परमेश्वराचा भक्त किंवा उपासक असावा आणि दुसरी तो परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे चालणारा असावा. याचा अर्थ की त्याचा संबंध परमेश्वराशी सरळ असावा. तो एक ख्रिस्ती व ख्रिस्ताच्या मंडळीचा सदस्य असावा.

उपासनेचा स्वीकार होण्यासाठी ती योग्य ठिकाणी केली गेली पाहिजे. (ख्रिस्ताच्या मंडळीत) योग्य लोकांसंगती केली पाहिजे आणि त्या सर्व नियमांनी केली पाहिजे जशी की प्रभूने आज्ञा दिली आहे.

येथे संगीताला विशेष महत्त्व दिले जाते पण एक खरा ख्रिस्ती कधीच अशा प्रकारच्या, सांप्रदायी मंडळीत किंवा धार्मिक गटात जावून

उपासना करू शकत नाही. कारण त्यांची उपासना खऱ्या उपासनेच्या अगदी वेगळी असते.जिचे वर्णन आताच केले आहे. एक खरा ख्रिस्ती व्यक्ती ख्रिस्ताच्या मंडळीचा सभासद,पवित्र शास्त्राप्रमाणे कधीच शनिवारी उपासना करीत नाही व अशाप्रकारे तो कधीच अशा लोकांशी उपासना करीत नाही की जे पुस्तकात लिहिलेल्याप्रमाणे उपासना करतात किंवा जे संगीताच्या संगतीत गातात किंवा अशा मंडळीसंगती तो प्रार्थना करीत नाही जे दर रविवारी प्रभू भोजन घेत नाही आणि ज्यांचे दशांश किंवा दान चुकीच्या शिक्षणाकरिता प्रोत्साहीत करतात.त्याचा उपयोग चुकीच्या गोष्टींकरिता होतो. पौल असे म्हणतो,"अंधाराच्या निष्फळ कर्माचे भागीदार होऊ नका. इतकेच नव्हे तर त्यांचा प्रतिकार करा" (इफिस ५:११). योहान खोट्या प्रचारकांना संबोधीत करितो तो त्याच्या दुष्कर्माचा भागीदार होतो (२ योहान ११).

तसे पाहता उपासक हा परिपूर्ण व्यक्ती नाही परंतु याचा अर्थ असा नव्हे की या एका कारणामुळे तो त्याला वाटेल तसे जीवन जगू शकतो. जर तो प्रभूची उपासना करू इच्छितो तर त्याने आपल्या सर्व वाईट सवयी, वाईट व्यवहार सोडून दिले पाहिजे.कारण चांगले करणे कळत असून जो त्याप्रमाणे वागत नाही त्याला ते पाप आहे.प्रचारकांनी शुद्ध हृदय,स्वच्छ देह आणि आत्म्याच्या दिनतेने प्रभूची उपासना करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आता तुम्ही कोणत्या प्रकारचे उपासक आहात? तुम्ही केव्हा उपासना करता? तुम्ही का उपासना करता? तुम्ही कोणाची उपासना करता? उपासक तर पुष्कळ आहे परंतु खरी उपासना करणारे फार कमी आहे. बहुतेक लोक एक तर अयोग्य व्यक्तीची उपासना करतात किंवा अयोग्य प्रकारे उपासना करतात म्हणून ही गोष्ट निश्चितपणे समजून घ्या की जेव्हा तुम्ही उपासना करता तेव्हा अशाच देवाची उपासना करा की जो त्यासाठी योग्य आहे आणि तुमची उपासना योग्य प्रकारची असावी जी प्रभूला आवडते.

● ● ●

# पवित्र शास्त्राविषयी थोडक्यात

**- फ्रँकलिन कॅम्प**

**जो** बायबलविषयी अभ्यास करतो त्याला काही गोष्टी काळजीपूर्वक विचार कराव्या लागतात. हे पुस्तक जे आपण अभ्यासत आहोत साधे नाही याचा दोन प्रकारे आपल्यावर परिणाम होऊ शकतो. योग्य प्रकारे अभ्यास करून ते अवलंबणे/ त्याचा अवलंब करणे जे आपल्या सार्वकालिक जीवनासाठी चांगले आहे. अयोग्य प्रकारे अभ्यास आपल्या आत्म्याचा नाश होण्यास कारण ठरू शकते.

पवित्र शास्त्र हे प्रत्येक माणसाचे पुस्तक आहे. ते कुणा एखाद्या समूहासाठी नाही. ते केवळ विशिष्ट माणसासाठीच नाही तर साधारण व्यक्तीसाठी ही आहे. विद्वान त्याचा अभ्यास करू शकतात पण ते कुणा विद्वानांनी लिहिलेले नाही.

वचनास कुणीही कधीही वाढवू शकत नाही. जो जास्त अभ्यास करेल ते वाढत जातात. बायबल असे पुस्तक आहे जे एखाद्याला सार्वकालिकतेकडे पाहण्याची योग्यता किंवा सक्षमता देते. बायबलच्या प्रेरणेचा उत्तम पुरावा त्याच्या आच्छादनामध्ये सापडतो. जोपर्यंत कुणी बायबलचा विद्यार्थी बनत नाही तोपर्यंत तो व्यक्ती उपयोगी ख्रिस्ती बनू

शकत नाही.

मॅथ्यू हेन्री म्हणतो, ''वचन हे आम्हास ज्योतिषी बनविण्यासाठी नाही तर संत बनविण्यासाठी लिहिले गेले. पौल तिमथ्यास वचन वाचण्यासाठी प्रेरित करतो तर यात आश्चर्य असे काही नाही. ''सत्य वचन योग्यप्रकारे विभागणे'' किंवा योग्य प्रकारे हाताळणे ह्याने तो देवासमोर योग्य प्रकारे काम करणारा ठरेल.

- पवित्र शास्त्र हे जगातील सर्वश्रेष्ठ पुस्तक आहे.ते समजण्यास उपयुक्त असून यात तुम्हास सत्य सापडते जे की इतर पुस्तकात मिळत नाही.
- पवित्र शास्त्र हे एकमेव पुस्तक आहे ज्यात देवाविषयी समाधानकारक जग, मानव, पाप, तारण, सेवा येथील आणि ह्यानंतरचे जीवन याविषयी वर्णन आढळते.
- पवित्र शास्त्र हे मानवाच्या चूका, मानवाच्या कमकुवतपणाबाबत संयमी आहे. ते मानवाच्या पापाबाबत कठोर आणि त्याच्या चांगुलपणा व आशेसाठी प्रामाणिक आहे.
- बायबलची माहिती असणे म्हणजे संपन्न असणे. बायबलचा अभ्यास करणे, माहिती घेणे, त्यावर विश्वास ठेवणे म्हणजे जीवनाचा शोध घेणे होय. बालबलचा अभ्यास करणे म्हणजे विद्वान होणे, त्याच्या आज्ञा पाळणे, सशक्त, सबल बनणे.
- बायबल माहीत असणे व त्याला योग्य प्रकारे एखाद्या व्यक्तीपर्यंत जाण्यासाठी उत्तम साधन आहे. एखाद्या माणसाला इंग्रजी, खगोलीय शास्त्र, साहित्य, संगीत, सामाजिक आणि तत्त्वज्ञान याविषयी माहीत असेल तरी जर एखाद्यास बायबल माहीत नसेल तर तो अयशस्वी आहे.
- जो बायबल माहिती करून घेण्यासाठी शोध घेतो तो त्यातील पुस्तके, त्यातील व्यक्तीरेखा ज्या पानागणिक उलगडत जातात त्यातील प्रकारांचा

अभ्यास करतो, त्याचे सिद्धांत, त्यातील मुद्दे, परिच्छेद वाक्य आणि शब्दांचा अभ्यास करतो हे आजीवन कार्य आहे.

- बायबल हे एक असे पुस्तक आहे जे अनेक दु:खापासून वाचवते. बर्मिंगहम अलाबामा येथील फिरत्या हॉटेलमधील गिडीयन्सच्याने बायबलच्या मलपृष्ठावर असे लिहिले आहे की, "ज्याने हे पुस्तक येथे ठेवले त्यास परमेश्वर आशीर्वाद देवो. मी एक एकवीस वर्षाची आईवडिलाविना असलेली तरुण स्त्री आहे. आज रात्री एक चुकीचे पाऊल उचलण्यापासून या पुस्तकाने मला वाचवले आहे. जसा मला या पुस्तकातून दिलासा मिळाला तसा पुढील वाचकास मिळो."
- सत्याची योग्य विभागणी करणे यापेक्षा महान सिद्धता, निपुणता जीवनात नाही. ती अशा प्रकारचा अभ्यास करण्यासाठी लागणारी त्यागाची किंमत आहे. कोणीही खऱ्या अर्थाने तोपर्यंत महान ठरू शकत नाही जोपर्यंत त्याला सत्य वचन माहीत नाही.
- जो कोणी या पुस्काचा अभ्यास करतो आणि कसे हाताळावे हे त्याला माहीत आहे. जो जगात सेवा करण्यासाठी, बक्षिसासाठी पात्र, योग्य आहे म्हणून पौल तिमथ्याला अभ्यास करण्यास कामकरी बनण्यास आणि देवाच्या पसंतीस उतरण्यासाठी शोध घेण्यास सांगतो यात आश्चर्य नाही. यापेक्षा अधिक महत्त्वाकांक्षा जगात नाही.
- बायबल हे एक आरसा आहे. ज्यात आपण स्वत:स बघू शकतो. तो एक असे अन्न आहे ज्याद्वारे आपणास शक्ती मिळते. एक दिवा ज्यात आपली वाट सापडते, एक प्रकारे हातोडा ज्यामुळे तोडू आणि जोडू शकतो, एक तलवार आहे ज्याद्वारे आपण लढू किंवा बचाव करू शकतो, रूजवू आणि वाढवू शकतो असे एक बी आहे आणि एक ध्येय ज्यामुळे आपण जिंकू शकतो.

आपणा सर्वास ह्या विचाराद्वारे वचनाचे एक मेहनती विद्यार्थी बनण्याची प्रेरणा मिळो. जेणे करून जे खरे जीवन आहे ते मिळण्याचा मार्ग सापडेल.

(फ्रँकलिन कॅम्प (१९१५-१९९१) हे नावाजलेले सुवार्ता प्रचारक होते, पण त्यापेक्षा जास्त त्यांची ओळख बायबलचे कष्टाळू मेहनती विद्यार्थी म्हणून होती. ते जवळजवळ ५० वर्षे दिवसातून सहा तास बायबलचा अभ्यास करीत असत. त्यांनी जास्तीत जास्त प्रचार हा अमेरिकेमधील अलाबामा व जॉर्जिया या भागात केला.

"...जे वचन मी सांगितले, तेच शेवटल्या दिवशी त्याचा न्याय करील." (योहन १२:४८)

• • •

पवित्र शास्त्र हे प्रत्येक माणसाचे पुस्तक आहे. ते कुणा एखाद्या समूहासाठी नाही. ते केवळ विशिष्ट माणसासाठीच नाही तर साधारण व्यक्तीसाठी ही आहे. विद्वान त्याचा अभ्यास करू शकतात पण ते कुणा विद्वानांनी लिहिलेले नाही.

# पवित्र आत्मा कोण आहे ?

- जे.सी.चोट

"**प**वित्र आत्मा" हा विषय खूप महत्त्वाचा आहे. कारण पुष्कळ जण तो आणि त्याचे कार्य याबाबत गोंधळात आहेत. बहुतेक जगाने त्यास एकत्रितरित्या स्वीकारले नाही तर उर्वरित अत्यंत विरोधात्मक शिकवितात की पवित्र आत्मा आज चमत्कारिकरित्या काम करतो पण पवित्र शास्त्र काय सांगते ?

बायबल सांगते की, पवित्र आत्मा हा एक व्यक्तिमत्व देवाच्या रूपाची तिसरी व्यक्ती आहे. देव आणि ख्रिस्त यांच्यासोबत तो शाश्वत आहे, होता आणि असेल. जुन्या करारातील निर्मिती आणि सर्व महान गोष्टीत, घटनेत त्याचा सहभाग होता. या पाठात आम्हास त्याच्या ख्रिस्त आणि प्रेषितांच्या काळातील कार्याविषयी शिकायचे आहे.

मागे वळून येशू ख्रिस्ताचा जन्म जर पाहिला तर नोंदीप्रमाणे "येशू ख्रिस्ताचा जन्म ह्याप्रकारे झाला. त्याची आई मरिया हिचे योसेफास वाग्दन झाल्यावर त्याचा सहवास होण्यापूर्वी ती पवित्र आत्म्यापासून गर्भवती झालेली दिसून आली. तिचा पती योसेफ नीतिमान होता व तिची बेअब्रू करण्याची त्याची इच्छा नसल्यामुळे तिला गुप्तपणे सोडण्याचा त्याने विचार

केला असे विचार त्याच्या मनात घोळत असता पाहा, प्रभूच्या दुताने त्याला स्वप्नात दर्शन देऊन म्हटले,

योसेफा, दाविदाच्या पुत्रा, तू मरियेचा आपली पत्नी म्हणून स्वीकार करण्यास अनमान करू नकोस. कारण तिच्या पोटी जो गर्भ आहे तो पवित्र आत्म्यापासून आहे. तिला पुत्र होईल आणि त्याचे नाव तू येशू असे ठेव. कारण तोच आपल्या प्रजेला त्यांच्या पापासून तारील.

हे सर्व अशासाठी झाले की, प्रभूने संदेष्ट्याच्याद्वारे जे सांगितले ते पूर्ण व्हावे; ते असे-पाहा कुमारी गर्भवती होईल व तिला पुत्र होईल आणि त्याला इम्मानुएल हे नाव देतील; ह्या नावाचा अर्थ 'आम्हाबरोबर देव'.

तेव्हा झोपेतून उठल्यावर त्याने प्रभूच्या दुताने आज्ञापिल्याप्रमाणे केले; त्याने आपल्या पत्नीचा स्वीकार केला तरी तिला पुत्र होईपर्यंत त्याने तिला जाणले नाही; त्याने त्याचे नाव येशू असे ठेविले''(मत्तय १:१८-२५).

कृपया या सर्व गोष्टीमधील पवित्र आत्म्याची भूमिका लक्षात घ्या. हा पवित्र आत्माच होता ज्याने यशया संदेष्ट्यास हे लिहिण्यास प्रोत्साहित केले. ''यास्तव प्रभू स्वत: तुम्हास चिन्ह देत आहे; पाहा कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल व त्याचे नाव इम्मानुएल (आमच्या सान्निध देव) असे ठेवील''(यशया ७ :१४). पुढे मरिया मुलासोबत आढळते ते या स्पष्टीकरणासोबत की ती पवित्र आत्म्यापासून गर्भवती झाली. शेवटी हे सर्व यासाठी झाले, कारण परमेश्वर संदेष्ट्याद्वारे जे बोलला की कुमारी पुत्रास जन्म देईल त्याचे नाव इम्मानुएल म्हणजे आम्हाबरोबर देव असे असेल हे पूर्ण व्हावे.

लुक अध्याय १ प्रमाणे, जखऱ्या आणि अलिशिबा यांना सुद्धा पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने मूल झाले. या घटनेत वांझ स्त्री गर्भवती झालेली आहे. या मुलाचे नाव योहान जो नंतर बाप्तिस्मा करणारा योहान या नावाने ओळखला गेला. कारण तो अशा लोकांचा बाप्तिस्मा करीत असे, जे

परमेश्वराच्या मर्जीप्रमाणे शरण जात असत किंवा वागत असत. ख्रिस्ताचा निरोप्या ज्यास परमेश्वराचा मार्ग सिद्ध करण्यास पाठवलेले होते तो म्हणाला मी पाण्याने तुमचा बाप्तिस्मा पश्चात्तासाठी करतो खरा परंतु माझ्या मागून जो येत आहे तो माझ्यापेक्षा समर्थ आहे. त्याच्या वाहणा उचलून चालण्याची देखील माझी पात्रता नाही; तो पवित्र आत्म्याने व अग्नीने तुमचा बाप्तिस्मा करणार आहे. त्याच्या हातात त्याचे सूप आहे, तो आपले खळे अगदी स्वच्छ करील व आपले गहू कोठारात साठवील, पण भूस न विझल्या अग्नीने जाळून टाकील.

तेव्हा योहानाच्या हातून बाप्तिस्मा घेण्याकरिता येशू गालीलाहून यार्देनेवर त्याच्याकडे आला; परंतु योहान त्याला मना करीत म्हणाला, आपल्या हातून मी बाप्तिस्मा घ्यावा असे असता आपण माझ्याकडे येता हे काय? येशूने त्याला उत्तर दिले, आता हे होऊ दे कारण ह्या प्रकारे सर्व धर्माचरण पूर्णपणे करणे हे आपणाला उचित आहे तेव्हा त्याने तसे होऊ दिले.

मग बाप्तिस्मा घेतल्यावर येशू लागलाच पाण्यातून वर आला आणि पाहा, आकाश उघडले तेव्हा त्याने परमेश्वराचा आत्मा कबुतरासारखा उतरतांना व आपणावर येतांना पाहिला आणि पाहा, आकाशातून अशी वाणी झाली की हा माझा 'पुत्र' मला परमप्रिय आहे. ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे"(मत्तय ३:११-१७).

ज्याप्रमाणे आपण आधी पाहिले की, मरियेस पवित्र आत्म्याद्वारे मूल प्राप्त झाले आणि येशू ख्रिस्ताने जगात जन्म घेतला आता एक प्रौढ म्हणून आपण पाहतो की येशूने योहानाकडून बाप्तिस्मा घेतला (पाण्यात बुडून) स्वर्गीय पिता याद्वारे संतुष्ट झाला. देवाचा आत्मा येशूवर उतरला आणि देव म्हणाला, हा माझा परमप्रिय पुत्र, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.

मत्तय ४:१ आम्हास सांगते, "तेव्हा सैतानाकडून येशूची परीक्षा

व्हावी म्हणून आत्म्याने त्याला अरण्यात नेले" सैतानाच्या आव्हानास व मोहास येशू कसा सामोरा गेला ? त्याने प्रत्येक वेळी पवित्र शास्त्रातील लेखाद्वारे उत्तर दिले. हे पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने लेखकांनी लिहिले आहे.

आम्ही योहान ३:३४ मध्ये वाचतो की, ख्रिस्ताला आत्मा हा मोजून, मापून मिळाला नव्हता तर पवित्र आत्म्याचे पूर्ण सामर्थ्य, जगात जे कार्य करण्यासाठी तो आला होता ते पूर्ण करण्याची पात्रता त्यास मिळाली होती. ह्या विधानानुसार विरोधात्मक बाजू म्हणजे इतरांना आत्मा मोजून मापून किंवा ते जे आत्म्याच्या सामर्थ्याद्वारे करीत त्यामध्ये मर्यादा होत्या.

ख्रिस्ताने जाण्यापूर्वी त्यास सादर करण्यासाठी आणि त्याचे कार्य पुढे नेण्यासाठी बारा माणसे निवडली. ज्यास प्रेषित म्हटले गेले. प्रेषित म्हणून घ्यावयाची पात्रता म्हणजे तो ख्रिस्तासोबत त्याच्या कार्यापासून ते पुनरूत्थानापर्यंत असायला हवा. पुनरूत्थित देव म्हणून त्याला स्वर्गीय पित्याकडे परत जाणे होते. येशूने त्याच्या शिष्यास (प्रेषितांस) सांगितले, "तरी मी तुम्हाला खरे ते सांगतो; मी जावे हे तुमच्या हिताचे आहे कारण मी न गेलो तर कैवारी तुमच्याकडे येणारच नाही" (योहान १६:७). तो पुन्हा सांगतो, "तरी ज्याला पिता माझ्या नावाने पाठवील तो कैवारी म्हणजे पवित्र आत्मा तुम्हाला सर्व काही शिकवील आणि ज्या गोष्टी मी तुम्हाला सांगितल्या त्या सर्वांची तुम्हास आठवण करून देईल" (योहान १४:२६).

येशूने वचन दिल्याप्रमाणे तो कैवारी म्हणून पवित्र आत्मा अनेक गोष्टी करू शकला. पवित्र आत्म्यात जेव्हा प्रेषितांनी बाप्तिस्मा घेतला (प्रेषित २ प्रमाणे) तो त्यावर वर्षाव करून, त्यांना सत्यात चालवेल, ख्रिस्ताने त्यांना जे शिकविले होते त्याची आठवण करून देईल आणि त्यांना देवाने पाठवले हे लोकांना कळावे म्हणून ते अनेक चमत्कार करतील.

परंतु प्रेषितांना सर्व कार्य करणे शक्य नव्हते, म्हणून देवाने त्यांना

सामर्थ्य दिले की निवडलेल्या शिष्यांवर त्यांनी हात ठेवल्यास शिष्यास देखील पवित्र आत्म्याचे सामर्थ्य प्राप्त होईल. जसे प्रेषितांना हे शक्य होते पण ज्या शिष्यांनी हे पवित्र आत्म्याचे दान स्वीकारले ते हे चमत्काराचे सामर्थ्य दुसऱ्यांना देऊ शकत नव्हते.

सरते शेवटी प्रेषित २:३८ प्रमाणे पाण्याच्या बाप्तिस्म्याच्या वेळेस, पापक्षालनाच्या वेळेस, इतरांनी सामान्य, चमत्कारिक नसलेला, मोजून, मापून पवित्र आत्मा स्वीकारला.

आम्ही आपणास आत्म्याचे वचन ऐकण्यासाठी उत्तेजन देऊ इच्छितो. परमेश्वराने ज्या गोष्टी सांगितल्या, देवावर विश्वास ठेवणे, आपल्या पापाबद्दल पश्चात्ताप करणे, ख्रिस्त हा परमेश्वराचा पुत्र आहे अशी कबुली देणे व बाप्तिस्मा घेऊन पुन्हा पाप न करणे, जेव्हा तुम्ही हे करता तेव्हा तो तुम्हास वाचवितो, त्याच्या मंडळीत तुमचा समावेश करतो, तुम्हास पवित्र आत्मा देतो (प्रेषित २:३८, ४७).

(जे.सी.चोट यांनी ६० वर्षे देवाची सुवार्ता गाजवली. उर्वरित आयुष्य त्यांनी आशियातील मिशन कार्यासाठी दिले.)

• • •

# उद्देशाचे सर्वश्रेष्ठ स्थान

- डेव्हिड डिफेनबॉंग

कोणा एका व्यक्तीने मला एक असा खडक दाखवला ज्याबद्दल त्याला अभिमान होता. तो खडक काही विशेष सुंदर नव्हता किंवा तो असाही नव्हता की ज्यात मौल्यवान धातू किंवा रत्न असेल. तो केवळ एक साधा सर्वसाधारण असा खडक होता. ज्या कारणासाठी अभिमानाने खडक ठेवलेला होता. ते म्हणजे तो कितीतरी वर्षापासून आईच्या अशा पलंगाचा तो आधार, टेकू होता. ज्या पलंगाचा एक पाय तुटलेला होता. अधिक काळ वापरल्यामुळे झिजून त्याच्या एका बाजूला किंचित वाटीसारखा आकार होता. त्याची किंमत ही भावनिक होती पण एका व्यक्तीसाठी खडकाने आश्चर्यकारक हेतूसाठी कार्य, सेवा केली होती आणि अशा प्रकारे तो एक मूल्यवान खजीना होता.

उद्देश हे महत्वपूर्ण आहे. ते एखाद्याची संवेदना किंवा जाणीव पूर्णत: बदलून टाकते. जेव्हा एखाद्या गोष्टीचा हेतू आपण समजत नाही किंवा त्याविषयी गैरसमज होतो त्यावेळी आपण त्या गोष्टी किंवा व्यक्तीविषयी योग्य समज करीत नाही.

वरवर पाहता पुष्कळ लोक असा विचार करतात की, बायबलचा

हेतू हा त्यांना श्रीमंत, आरोग्यपूर्ण, यशस्वी, आनंदी इत्यादी बनवणे आहे. ते त्याकडे प्रश्न घेऊन सामोरे जातात. बायबल माझ्यासाठी काय करू शकते? तो चुकीचा प्रश्न आहे. तो असा असावा ''बायबल माझ्याकरिता काय करेल?''

मानवाला परमेश्वरासाठी स्वीकाहार्य योग्य बनवणे हा बायबलचा उद्देश आहे. उदाहरणार्थ लेवीयचे पुस्तक हे अनेक नियम व आज्ञांचा संग्रह आहे. ज्यामुळे माशेचा नियम किंवा कायदा बनला. या सर्व आज्ञांचा, नियमांचा, निर्देशांचा जेव्हा आम्हाला जाणीव हाते की, बायबल हे आम्हाला पूर्णत: बदलणारे, घडवणारे, दिशा दाखवणारे आहे. हे उल्लेखनीय आहे की, आमची त्याच्या उद्देशाची बदललेली संवेदना किंवा पाहण्याची क्षमता शेवटी परिणामकारक होण्यास परवानगी देते.

(डेव्हिड डिफेनबॉग यांनी पॅरगोल्ड, ॲरकॅनसॅस, यू.एस.ए. येथील सेन्टर हिल मंडळीकरिता प्रचारक म्हणून काम केले.)

● ● ●

**मानवास देवाकरिता स्वीकार्य योग्य बनवणे हा बायबलचा उद्देश आहे**

देवाची इच्छा मानवाकरिता आहे. तो प्रेमाने स्वीकारू शकतो. मित्र बनू शकतो आणि त्याचे स्वत:चे म्हणून दावा करतो आणि शेवटी त्याचे प्रकट वचन आम्हास आपल्या पापातील दशेविषयी, अवस्थेविषयी, तारणाविषयी जे केवळ येशू ख्रिस्ताद्वारे शक्य आहे. मंडळी तारण पावलेल्यांचे शरीर आहे आणि त्यामध्ये अशाप्रकारचे खंडणी भरून सुटका झालेले जिवंत लोक राहतात.

# बायबल बाप्तिस्मा आणि सुवार्ता तारण

**- पेरी एन. हॉल**

**ये**थे आपण तिसऱ्या सहस्त्रामध्ये आहोत आणि जग अजूनही पापात हरवलेले आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आता माणसांना पूर्वीच्या ग्रहांच्या इतिहासापेक्षा ख्रिस्ताच्या रक्ताने शुद्ध होण्याची जास्त गरज आहे पण इतिहासाचा हा काळ नंतरचा 'ख्रिस्ती कालखंड' म्हणून ओळखला जातो. काही म्हणतात की ख्रिस्ती हे अवनतीकडे जात आहे. जर हे खरे आहे तर हे केवळ माणसाची बायबल हा देवाचा शब्द म्हणून न स्वीकारण्याची आणि त्याच्या शिकवणुकीचे अनुकरण न करण्याची इच्छा पुष्कळ जण जे ख्रिस्ताचा मित्र म्हवून घेण्याचा दावा करतात ते शिकवणीस नाकरतात. ईश्वरी प्रकटीकरणाऐवजी सिद्धांत आणि माणसांच्या आज्ञा पाळतात.

बायबलचा बाप्तिस्मा आणि त्याचा तारणारी सुवार्ता संबंध यापेक्षा उघड व्याप्ती कुठली नाही. हे अविश्वसनीय आहे पण जे साधारणपणे स्वत:ला ख्रिस्तानुयायी म्हणवतात ते दोघांमधील संबंध नाकारतात तर ते सांप्रदायिक बाप्तिस्मा निवडतात पण हे पश्चात्तापी विश्वासणाऱ्याच्या बुडण्यात आहे. जे ख्रिस्ताचे मरणे, पुरणे व पुनरूत्थान आहे हे त्याचे मरण जेथे त्याचे रक्त आणि त्याच्या फायद्यापर्यंत जाते. (१ ले करिंथ, १५:१-४, रोम ६:३-६)

ह्यावरून हे समजण्यास सोपे आहे की, पापी आणि तारण यामध्ये पाण्याचा बाप्तिस्मा काय आहे (मार्क १६:१६, १ ले पेत्र ३:२०,२१) बाप्तिस्मा हा पापी आणि क्षमा यांना विभागणारी रेषा आहे (प्रे.कृ.२२:१६) तारण हे ख्रिस्तात आहे (इफिस १:३, २ रे तिमथी २:१०) पश्चात्तापी विश्वासणाऱ्याने ख्रिस्तात बाप्तिस्मा घेतला (रोम ६:३) त्याने किंवा तिने ख्रिस्ताला परिधान केले. (गलती ३:२७) ख्रिस्तात नवी उत्पत्ती आहे (२ रे करिंथ ५:१७) आणि अभिवचनाद्वारे वारिस बनतात ( गलती ३:२७-२९).

आत्म्याच्या शिकवणीनुसार बाप्तिस्मा हा पापी आणि ख्रिस्ताच्या मंडळीचा सभासद बनणे यांच्यामध्ये उभा आहे. (१ ले करिंथ १२:१२,१३) ज्याचा ख्रिस्त मस्तक आणि तारणारा आहे (इफिस ५ :२३) जेथे समेट दिसतो (इफिस २:१६) बाप्तिस्मा पापी, नवा जन्म आणि राज्याची नागरिकता यांच्यामध्ये उभा आहे (योहान ३:३-५)

जर बाप्तिस्मा नाकारला गेला तर सुवार्ता ऐकणारा पापी आनंदी नाही (प्रे.कृ.२:४१) सुवार्तेद्वारे आज्ञाधारकपणा हा सिद्धांताच्या आकाराकडे नेले पापाच्या गुलामगिरीतून सुटका देते (रोम ६:३-१८) आणि ख्रिस्ताचे होण्यासाठी कारण बनते (१ ले करिंथ १:१२-१३) पापांची सुटका किंवा माफी यामुळे बाप्तिस्मा हा पापी आणि आनंद या दोघांत उभा राहतो (प्रे.कृ ८:३५-३९) बाप्तिस्म्यापर्यंत वैयक्तिक प्रबोधनामुळे स्पष्टपणे सद्सद्विवेकबुद्धी मिळत नाही हे देवाला विनंती आणि याचे उत्तर आहे (१ ले पेत्र ३:२१).

प्रिय मित्रा ऊठ आणि पवित्र शास्त्राच्या बाप्तिस्माप्रमाणे बाप्तिस्मा घे आणि ख्रिस्ताच्या रक्ताने तुझी पापे धुऊन टाक. सुवार्तेमध्ये देवाचे सामर्थ्य आहे ज्याद्वारे तारण होते (रोम १:१६) आणि तारण स्वीकारण्यासाठी ते आपल्या आज्ञापालनात प्रकट व्हायलाच हवे (रोम १:५, १६:२५-२७; २ रे थेस्सलनी १:७-९; इब्री ५:८,९)

(पेरी एन. हॉल हे सुवार्ता प्रचारक असून त्यांचे वास्तव्य टेलर, टेक्सास यु.एस.ए.येथे आहे.) • • •

# दाखल्याचे सामर्थ्य

**- वेन जॅक्सन**

ग्रीकच्या नवीन करारात अनेक नियम आहेत. ज्याचा अर्थ इंग्रजी शब्द 'एक्झामपल' किंवा दाखला आहे. 'डिग्मा' (Deigma) हा शब्द दाखवणे म्हणजे नमुना असे दर्शवितो. यहुद्यांच्या पत्रामध्ये अनितीमान सदोम आणि गमोराचा कायमस्वरूपी विनाश हे नरकातील अनंतकालीन शिक्षेचा दाखला आहे (यहुदा ७). 'ह्यू पोडिग्मा' (Hupodrigma), चा शब्दश: अर्थ 'दाखवणे' चांगले किंवा वाईट यांचे उदाहरण दर्शवितो. आम्ही इस्त्राएलच्या रानटी तत्वाच्या उदाहरणाचे अनुकरण करू नये (इब्री ४:११). ग्रीक 'ट्युपॉस' (Tupos) एक छापीत (योहान २०:२५) किंवा एक 'नमुना' (इब्री ८:५) दर्शवितो म्हणून वडील हे देवाच्या कळपाचे उदाहरण आहे (१ ले पेत्र ५:३) आध्यात्मिक ग्रीकमध्ये 'हायपोट्यूपॉस' (Hypotuposis) म्हणजे एक रूपरेषा किंवा कच्चा आराखडा. नवीन करारात ते वर्तणुकीचे उदाहरण किंवा सिद्धांताचा नमुना असे दर्शविते. (१ ले तिमथी १:१६ व २ रे तिमथी १:१३) 'हयपोग्रामॉस' (Hypogrammos) हा शब्द (शब्दश:च्या अधिकाराखाली लिहिणे) प्राचीन ग्रीकमध्ये बालकाच्या लेखी स्वाध्यायातील अक्षरांची नक्कल (Copying) करणे यासाठी वापरला आहे. हा संदर्भ पापरहित ख्रिस्त ज्याने त्रास सहन

केला आणि विश्वासपूर्वक त्याची काळजी पित्यावर टाकली असे वर्णिला आहे (१ ले पेत्र २:२१).

**दाखल्याविषयी काही वास्तविक सत्य :**

दाखल्याच्या सामर्थ्याविषयी बायबल वारंवार आवाहन करते. खालील गोष्टी लक्षात घ्या.

परमेश्वर आहे. देवाने प्राचीनकाळी त्याच्या लोकांना आज्ञा केली, "तुम्ही पवित्र असावे, कारण मी परमेश्वर तुमचा देव पवित्र आहे." (लेवीय १९:२) त्याचप्रकारे ख्रिस्त समज देतो. "ह्यास्तव जसा तुमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे तसे तुम्ही पूर्ण व्हा" (मत्तय ५:४८). दाविदाच्या जीवनात यहोवाच्या प्रेमळ दयेचे उदाहरण आहे. (स्तोत्र २६:३) आपल्या अनैतिकतेबद्दल स्वर्गाच्या क्षमाशीलतेच्या व्याप्तीचे उदाहरण आपणास प्रेरणा देते की आपण त्याच्यावर दया करावी ज्यांनी आपणास दुखावले आहे, त्रास दिला आहे (इफिस ४:३२)

ख्रिस्त हा आपणासाठी उदाहरण, कित्ता आहे. येशू हा अनेक महान प्रकाराचे उदाहरण आहे. तो एक नितीमान जीवनाचे उदाहरण आहे. तो कधीही पापाच्या मोहात पडला नाही (इब्री ४:१५) आपल्या पित्याच्या इच्छेप्रमाणे वागण्यात तो आनंदी होता (स्तोत्र ४०:८) आणि त्या दिशेने, मार्गाने तो काळजीपूर्वक चालत गेला (योहान ८:२९) परमेश्वर हा सेवेचे (योहान १३:१५) आणि दु:खाचे उदाहरण आहे (१ ले पेत्र २:२१) प्रेषितांच्या कृत्यांमध्ये ख्रिस्ताच्या प्रभावाचे स्पष्ट वर्णन आहे. पेत्र आणि योहान यांच्याकडे पाहून यहुदी शासनकर्ते म्हणत "हे येशू सोबत होते त्याच्याकडून ज्ञान घ्या" (प्रे.कृ.४:१३) तारणाऱ्याचे काय हे अद्भूत वर्णन.

ख्रिस्तीजन हे एक चांगले उदाहरण आहे. पौल त्याचे पत्र वाचणाऱ्यांना वारंवार त्याच्या उदाहरणाचे अनुकरण करण्यास सांगतो. ज्यात ख्रिस्ताच्या जीवनाची प्रतिमा आहे. करिंथकरास त्याने लिहिले "जसा

मी ख्रिस्ताचे अनुकरण करणारा आहे तसे तुम्हीही माझे अनुकरण करणारे व्हा" (१ ले करिंथ ११:१). पौलाने तिमथ्यास दुसऱ्यांसाठी एक कित्ता बनण्यास प्रेरित केले. "भाषण, वर्तन, प्रीती, विश्वास व शुद्धता ह्यांविषयी विश्वास ठेवणाऱ्यांचा कित्ता हो" (१ ले तिमथी ४:१२) कोणीही चांगल्या उदाहरणासोबत वाद करू शकत नाही. हे इतके साधे सोपे आहे म्हणून पेत्र म्हणतो, "ख्रिस्ती स्त्री जिने अविश्वासणाऱ्याबरोबर विवाह केला आहे, "स्त्रियांनो, तुम्हीही आपआपल्याला पतीच्या अधीन असा, ह्यासाठी की कोणी वचनाला अमान्य असले तरी तुमचे भीडस्तपणाचे निर्मल वर्तन पाहून ते वचनावाचून आपल्या स्त्रियांच्या वर्तनाने मिळवून घेतले जावे (१ले पेत्र ३:१२).

**दाखले आणि अधिकार :**

या दिवसात प्रेषितीय उदाहरणे, दाखले हे धार्मिक सराव चालू ठेवण्यासाठी योग्य माध्यम आहेत की नाही यावर मोठा मतभेद आहे. उदाहरणार्थ मंडळीचे परमेश्वराच्या पवित्र दिवशी प्रभूभोजन घेणे हे एकमेव बांधील उदाहरण आहे का?

सर्वप्रथम आपण साधा प्रश्न उचलू. काय नवीन करारातील दाखल्यांमध्ये अधिकाराची ताकद आहे अशी तात्विक संमती देतो काय? खालील बाब लक्षात घ्या.

१) प्रे.कृ.११मध्ये जेव्हा पेत्र यरूशलेम येथील भावांबरोबर यहुदीतर लोकांना मंदिरात प्रवेश करण्यासंबंधी वाद घालतो तेव्हा त्यांने कर्नेल्याच्या कुटुंबात आत्म्याने कसे कार्य केले या उदाहरणाचा आधार घेऊन ह्या लोकांना 'ख्रिस्ती' म्हणून नाव मिळाले याचा पुरावा देतो. यहुदी तर लोकांना कारणे म्हणजे देवाला प्रतिकार करणे (प्रेषित ११:१५-१७).

२) प्रेषितांची कृत्याच्या १५ व्या अध्यायात जेव्हा प्रश्न उपस्थित झाला की काय यहुदीतर लोकांना तारणासाठी पौल आणि बर्णबासाठी तसेच पेत्र

ज्याने उदाहरणाद्वारे सिद्ध केले की देवाने कसे त्यांच्यामध्ये अद्‌भूत कार्य केले. सुंतेची गरज आहे काय? तेही मोशेच्या नियमाच्या अधीन न होता. अशा रितीने तारणासाठी सुंता ही बंधनकारक नव्हती (प्रेषित १५:४,६-१२) दाखले बंधनकारक असू शकतात ( २ रे तिमथी १:१३)

प्रभू भोजनाच्या प्रश्नाकडे परत वळू या. आपण या निर्णयापर्यंत कसे येऊ शकतो की रविवारी प्रभूभोजन घेण्याचे उदाहरण हे एक बंधनकारक शिरस्ता आहे ? (प्रे.कृ. २०:७) उत्तर : नवीन कराराचा संपूर्ण संदर्भ (ते म्हणजे या खेरीज याच विषयावरील पवित्र शास्त्रातील माहिती) आम्हास प्रभू भोजन व आठवड्याचा पहिला दिवस याचा आध्योत्मिक संबंध दर्शवितो. सहभोजनाचा भाग, घटक (भाकर आणि द्राक्षरस) हे तारणाऱ्याच्या मरणाचे स्वरूप दाखवते (मत्तय २६:२६-२८) आणि आठवड्याचा पहिला दिवस त्याच्या पुनरूत्थानाचे स्मरण, आठवण देतो (योहान २०:१) अर्थात म्हणून रविवार प्रभू भोजनासाठी बंधनकारक दिवस बनला.

(बेन जॅक्सन हे ख्रिश्चन कुरिअरचे संपादक आहेत व त्यांचे वास्तव्य स्कॉटलॅण्ड, कॅलिफोर्निया, यूएसए येथे आहे.)

• • •

आम्ही तुम्हाला विभिन्न भाषांतील सुवार्ता घोषणेच्या प्रयत्नामध्ये लांभांकित व्हावे ह्यासाठी उत्तेजन देत आहोत.

## T.V./ Radio Program/ Magazine / Bible Courses

**GRACIOUS WORD** — **TAMIL**

Speakers : **Philemon & Kingsly Rajah**
T.V. Program : **Nambikki TV-** Friday 6-15 a.m.
**Tamilan TV-** Sunday 6-45 a.m.
Magazine : Kirubaiyulla Vaarthai (Monthly Tamil)
The Voice of Truth Intl. (English Qtly.)
Bible corres.Course : Basic and Advanced Bible
**Correspondence Courses (Tamil & English)**
**J.C. School Of Evangelism** : Training faithful men and women for Evangelism @ their Place

Online Bible Course@ : **www.graciousword.org.(Tamil&English)**

**God's word to the Visually Challenging People**

-The Voice of Truth International Braille Edition,Tamil& English-Free
- Braille Bible Lessons, Tamil& English-Free
- Free MP3 Player Audio Bible for Blinds,Different Languages-Free

**For more information and Bible Course, write to**

Church of Christ, Post Box 15, Arasaradi, Madurai-625016.
Tamilnadu (India) Cell : 92 4421, 4421, 92 4431 4431
Email : obey2jesus@gmail.com Visit : www.graciousword.org

---

**SATHYA VAZHI**

Speakers : **P.R. Swamy (Evangelist)**
Radio Program : Sunday to Wednesday 5.30 p.m.
Srilanka All Asia Service-25 & 49 Meter band
Magazine : Sathya Vazhi (Tamil)
Programs : Bible School & Bible Corres. Courses

**For more information write to**

**"Sathya Vazhi"**, Post Box 8405, Bengaluru - 560 084
Phone : 080-25463507 Cell : 098440 70763
Email : prsdoug@hotmail.com

---

**THIRUMARAI AASAN**

Speaker : **Rajanayagam**
T.V. Program : **Tamilan T.V.**-Monday 7.00 a.m.
Thursday 9.30 p.m. & Saturday 7.15 a.m.
Magazine : Thirumarai Aasan (Monthly)
Tamil Qtrly Magazine : "Sathiyathin Kural" (TVOTI- Tamil)
Advanced Bible Correspondence Course Available in Tamil

**For more information write to**

**Church of Christ,** Post Box 27, Dharapuram Road,
Kangeyam - 638701 Cell : 9842730382

---

**THE WORD OF CHRIST**

Speaker : **B. Arjunan**
T.V. Program : **Tamilan T.V.**-Monday,Saturday7.30 -7.45a.m.
Magazine : The word of Christ (Monthly)
Radio Program : SW25 & 41m (Saturday 5.30 to 5.45 p.m.)
Srilanka All Asia Service

**For more information write to**

**The Word of Christ,** Post Box 5, Batlagundu - 624206.
Dindigul Dist. Cell : 9443558041

---

**SATYAVANI** **TELUGU**

Speakers : **Joshua & Ricky Gootam**
T.V. Program : **Subhavartha Channel** Sunday 6.00 p.m.
**Rakshana Channel**
Wednesday 6.30 p.m. Thursday 11.00 a.m.
Satyavani T.V. Online : www.sakthitv.in
Every Wednesday & Friday at 8.00 p.m.

**For more information & Bible course write to**

Post Box 80, Kakinada, Andhrapradesh-533001.
Phone : 08842363722 E-mail : jgootam@yahoo.com

---

# व्हाईस ऑफ ट्रुथ इंटरनॅशनल
## फॉर्म

- मी व्हाईस ऑफ ट्रुथ (मराठी) माझ्यासाठी मागवू इच्छितो / इच्छिते. मी चार अंकासाठी वर्गणी रू. १००/- चेक / मनीऑर्डरने पाठवित आहे. माझा पत्ता खाली दिला आहे.
- मी व्हाईस ऑफ ट्रुथ (मराठी) माझा मित्र ........................ ह्याच्यासाठी मागवू इच्छितो / इच्छिते. मी चार अंकासाठी वर्गणी रू. १००/- चेक / मनीऑर्डरने पाठवित आहे. माझा पत्ता खाली दिला आहे.
- मी २५ प्रतींची वर्गणी रू. ५०० पाठवित आहे. ह्याप्रकारे पूर्ण मंडळीच्या लोकांसाठी ह्या प्रती मागवून तुम्ही प्रचार करण्यासाठी मदत करून आशीर्वाद प्राप्त करू शकता.

**कृपा करून ह्या फॉर्मला भरून चेक सोबत एका पाकीटामध्ये टाकून किंवा मनीऑर्डर सोबत खाली दिलेल्या पत्त्यावर पाठवून द्यावे. चेक/मनीऑर्डर खाली दिलेल्या नावाने पाठवावे.**

**Amul Dayanand Bansod**
**F/5 Siyon Nagar, Near D.K.M.M. College, Lani Road,**
**Pahadsingpura, Aurangabad - 431 001 (M.S.) India**

Name ..............................................................................
Add ..............................................................................
..............................................................................
City ........................ State ........................ Pin ................................

**MALAYALAM**

Speaker : **P.K. Vargheese**
T.V. Program : **Jai hind Channel**
Every Saturday 6 a.m. to 6.30 a.m.
Magazines : Bible Truth - Monthly
& Truth for Today (Bi-monthly)

**For more information & Bible course write to**
**Church of Christ**, Tampuranmukku, Trivandrum- 695 035.
Phone : 0471 - 2303378, Cell : 9447035465

---

**HINDI**

T.V. Program : **Shubh Sandesh Hindi Channel**
Every Sunday, Tuesday 7.00 pm to 7.30 pm
Speakers : **Sunny/ Francis/ Vinay David**
Magazine : **English Bible Teacher - Sunny David**
E-mail : sunny_davidin@yahoo.co.in
Cell : 09810896789
**Hindi Bible Teacher - Francis David,**
Email : davidfrancis53@rediffmail.com
Cell : 09911916932
Bible Courses : **Hindi & English - Vinay David**
Emai: vinay_david2002@yahoo.co.in
Cell : 09911719517
Church meets at: C.R. Park, 1st block, Near Market
No. 4, New Delhi - 110019
Sunday Worship: 11.00 a.m.

**For more information write to :**
**Church of Christ**, Post Box 3815, New Delhi - 110049

---

**BRALLE MAGAZINE & BRAILLE BIBLE COURSE** Available for Visually Challenging People in Tamil/English/ Telugu Languages.

---

Write to : **THE VOICE OF TRUTH INTERNATIONAL-BRAILLE EDITION**
P.O. Box : 15, ARASARADI, MADUARAI-625 016. TAMILNADU
Email : obey2jesus@gmail.com Ph.: 92 4421 4421